मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
Email : vrittamanas1@gmail. com

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

मुंबई/ पालघर | बुधवार, १३ ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक-५३ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



युनुस सरकारला धक्का, भारताकडून नवे निर्बंध पान ८

प्रासंगिक

## आंदोलनाचा चित्रपट सुरू!

निवडणुका जवळ आल्या की आंदोलनाचा चित्रपट जागोजागी सूरू होतो. त्याचाच एक भाग म्हणजे राजधानी दिल्ली आणि महाराष्ट्रात काल आंदोलनाचा चित्रपटाला सुरुवात झाली. चित्रपटाची कथा आहे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत झालेली कथित मतांची चोरी आणि बिहारमधील मतदार फेर आढावा मोहीम या संदर्भातच दिल्लीत निवडणूक आयोगाच्या कार्यालयासमोर आंदोलन झाले. तर भ्रष्ट मंत्र्यांची हकालपट्टी व्हावी यासाठी महाराष्ट्राच्या सर्वच जिल्ह्यात 'जनआक्रोश' आंदोलन छेडण्यात आले. दोन्ही आंदोलने प्रत्यक्षात भाजपा सरकारविरोधात नसली तरीही या आंदोलनाने सत्ताधारी भाजपासमोर अडचणी निर्माण होणे साहजिकच आहे. कारण दोन्ही आंदोलने सत्ताधारी भाजपाशी निगडित आहेत. यामुळेच कोंगेस नेते राहुल गांधी यांनी हे प्रकरण रेटून धरले. मतदानात कश्याप्रकारे चोरी झाली किंवा करण्यात आली याचे पुराव्यासह राहुल गांधी यांनी मागील आठवड्यातच आरोप केले होते. इथेच राहुल गांधी थांबले नाहीत तर त्यांनी पत्रकार आणि इंडिया आघाडीतील घटक पक्षातील सर्वच नेत्यांसमोर मतदान चोरी प्रकरणाचे सादरीकरणही केले. परिणामी मतदानात झालेला गैरप्रकार जनतेच्या निदर्शनास आला आणि संपूर्ण देशात मतदान चोरीबाबत चर्चा सुरु झाली. आधीच EVM मशीनच्या कार्यपद्धतीबाबत गेली अनेक वर्षे सर्वांच्याच मनात शंका होतीच. त्यात मतदानात चोरी झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केल्याने EVM मशिन्सबाबत जनतेच्या मनात असलेली शंका गडद होण्यास वाव मिळाला. मुळात मतांच्या झालेल्या कथित चोरीबाबत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाची भेट मागितली होती. निवडणूक आयुक्तानी ही भेट दिली असती तर मत चोरीचे हे प्रकरण इतके चिघळले नसते. परंतु आयोगाने राहुल गांधी यांना भेट नाकारली. मतदान चोरीबाबत केलेलं आरोप शपथपत्रावर लिहून द्यावे असे निवडणूक आयोगाने गांधी यांना कळविले. यामुळे हे प्रकरण चिघळले आणि वातावरण अजून तापले. त्यामुळेच निवडणूक आयोगाच्या आयुक्ताना भेटण्यासाठी राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली तब्बल तीनसे खासदारांनी संसदभवनापासून मोर्चा काढला. पण निवडणूक आयोगाच्या मुख्यालयावर पोहचण्यापुर्वीच पोलिसांनी सर्वच खासदारांना रोखले. त्यानंतरचा सारा सीन नेहमीचाच होता. राहुल गांधी, प्रियंका गांधी, शरद पवार, संजय राऊत यांच्यासह अनेक खासदारांना स्थानबद्ध केले. आणि नंतर सोडून दिले. कार्यकर्ते असले असते तर पोलिसांनी पोकळ बांबूचे फटके घातले असते. पण तसे झाले नाही. तर दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात भ्रष्ट मंत्र्यांविरोधात 'जनआक्रोश' आंदोलन केले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील भ्रष्ट मंत्र्यांना समोर ठेऊनच हे 'जनआक्रोश' आंदोलन करण्यात आले होते असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. असे असले तरी मतचोरीबाबत झालेले दिल्लीतील आंदोलन आणि महाराष्ट्रातील भ्रष्ट मंत्र्याच्या विरोधात महाराष्ट्रात झालेल्या आंदोलनाने सामान्यांना फारसा काही फरक पडला नाही, आणि पडणार नाही. कारण निवडणुकीत मतचोरी करणे आणि मंत्र्यांनी भ्रष्टाचार करणे हे देशात आणि राज्यात प्रथमच काही घडले असे अजिबात नाही. देश स्वातंत्र्य झाल्यापासून मत चोरीच्या घटना सातत्याने घडतच आहेत. जेव्हा मतदानासाठी EVM मशिन्सचा वापर नव्हता, बॅलेट पेपरवर मतदान होत होते, तेव्हाही मतदानात चोरी होत होतीच. संपूर्ण बूथच्या बुथ ताब्यात घेऊन मतपेट्या बदलण्यात आल्याच्या बातम्या त्याकाळातही येत होत्या. त्यामुळेच विदेशात मशिन्सवर जसे मतदान केले जाते तसे भारतातही केले जावे अशी त्यावेळी सर्वांचीच मागणी होती. ती मागणीही पूर्ण झाली. मतदानासाठी EVM मशिन्स आल्या. पण... मतचोरीचा प्रश्न तशाच राहिला. आजही मतचोरी होतच आहे किंबहुना त्यात वाढ झाली आहे असे राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपवरून दिसून येत आहे. भ्रष्ट मंत्र्यांच्या बाबतीत याच कथा आहेत. महायुतीतील फडणवीस सरकारमधील मंत्र्यांनी प्रथमच भ्रष्टाचार केला आहे का! असे अजिबात नाही. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच मंत्र्यांचा भ्रष्टाचाराचा हा सिलसिला सुरूच आहे. त्यावेळी प्रसार माध्यमे तितकीसी नव्हती त्यामुळे भ्रष्टाचार बाहेर येत नव्हता. दुसरे म्हणजे देश असो की राज्य असो अर्थसंकल्प तितकाही ताकतीचा नव्हता. त्यामुळे भ्रष्टाचार करण्याचीही मर्यादा होती. त्यातूनही तत्कालीन मुख्यमंत्री अब्दुल रेहमान अंतूले यांचा १९८२ साली सिमेंट घोटाळा गाजलाच. याच सिमेंट घोटाळ्यामुळे अनेक इमारती कोसळल्या आणि अनेक निष्पाप नागरिकांचे बळी गेलेत. १९८२ वर्षातील इमारत आहे असे म्हटल्यावर महापालिका आजही सतर्क होते. अशा पद्धतीने अनेक मंत्र्यांनी भ्रष्टाचार केला. या भ्रष्टाचारामुळे ज्यांचे मंत्रिपद गेले ते पुन्हा मंत्री झालेले सर्वांनीच पाहिले. देशात आणि राज्यात ज्या मंत्र्यांनी महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, साखर कारखाने उभे केलेले आहेत ते काय स्वतःच्या कमाईने केलेले आहेत! तसा गैरसमजही कोणी करून घेऊ नये. यात मोठ्या प्रमाणात प्रशासनातील अधिकारीही सामिल असतात हेही सर्वाना माहित आहेच. ज्या भ्रष्ट मंत्र्यांच्या विरोधात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने 'जनआक्रोश' आंदोलन उभारले आहे.. ते सारे मंत्री तीनच वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होतेच. त्यामुळे कोणी कोणाच्या विरोधात भ्रष्टाचाराचे किंवा मतचोरीचे आंदोलन करणे कितपत योग्य आहे असा प्रश्न सामान्यांसमोर कायमस्वरूपी निर्माण झालेला असतो. यातून कायमस्वरूपी कधीच मार्ग निघाला नाही आणि मार्ग निघणारही नाही असे ठामपणे म्हणायला हरकत नाही. उद्या उद्धव ठाकरे यांचे महाराष्ट्रात आणि राहुल गांधी यांचे दिल्लीत सरकार येवूही शकते. पण सत्तेवर आल्यावर भ्रष्टाचार होणार नाही याची उद्धव ठाकरे खात्री देऊ शकणार का! मुंबई महापालिकेत भ्रष्टाचार होणार नाही हे उद्धव ठाकरे सांगू शकतील का! किंवा मतदानात चोरी होणार नाही हे राहुल गांधी सांगू शकतील का! यापैकी ना उद्धव ठाकरे खात्री देऊ शकत, ना राहुल गांधी. कारण राजकारणाचा एक अलिखित नियमच आहे... 'ज्याच्या हाती ससा, तो पारधी' आज दिल्लीत भाजपा पारधी आहे तर महाराष्ट्रात महायुती पारधी आहे. त्यांना पाहिजे तेव्हा जनता रुपी गरीब 'ससा'ला कापणारच. हा ससा कसा कापायचा आणि कोणत्या ठेकेदाराने कापायचा हे सारे अधिकारीच ठरवितात. सारेच एकाच माळेत गुंतलेले मणी आहेत. यामुळेच आंदोलनाचा हा चित्रपट सुरूच राहणार! आंदोलनाच्या चित्रपटाची मालकी आज राहुल गांधी च्या काँग्रेस कडे आणि उद्धवच्या शिवसेनेकडे आहे भविष्यात ही मालकी भाजपाकडेही येऊ शकेल. मंत्र्यांनी भ्रष्टाचार करायचाच आहे आणि कार्यकर्त्यांनी रस्त्यावर आंदोलन करायचेच आहे. यालाच नेत्यांचे राजकारण म्हणतात.

**सुरेंद्र मुळीक**

## महायुतीत रंगले मानापमान नाट्य

# उपमुख्यमंत्री शिंदे, गोगावलेंची मंत्रिमंडळ बैठकीला दांडी

■ **मुंबई**

महायुतीमध्ये पालकमंत्रीपदावरुन सुरु असलेला वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये झेंडावंदनाची दोरी मंत्री अदिती तटकरे यांच्या हातात देण्याचा निर्णय झाल्यामुळे मंत्री भरत गोगावले नाराज असल्याची चर्चा आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीला त्यांनी दांडी मारली. तसेच शिवसेनेचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेदेखील बैठकीला गैरहजर होते.

उपमुख्यमंत्री शिंदे 10 ऑगस्टला श्रीनगर दौऱ्यावर गेले ते अजून परतलेले नाहीत. तर गोगावले दिल्लीमध्ये मुक्कामी आहेत. ते नेमके कोणाच्या भेटीसाठी गेले यावरुनही राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावर शिंदे



सेनेने दावा केला आहे. रायगडमध्ये पालकमंत्रीपदावरुन राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) मंत्री अदिती तटकरे आणि शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांच्यात कित्येक महिन्यांपासून वाद सुरु आहे. अशातच रायगड जिल्ह्यात येत्या स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहणाचा मान अदिती तटकरे यांना देण्यात आला आहे. यामुळे पालकमंत्रीपदाचा वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. शिवसेनेच्या मंत्र्यांना सन्मान मिळत नसल्याने नाराजी आहे, त्यामुळेच उपमुख्यमंत्री शिंदे यांनी श्रीनगरचा दौरा वाढवला, अशी चर्चा आहे.

आजच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नाशिक जिल्हा पालकमंत्रीपदासाठी आग्रही असलेले शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे देखील गैरहजर होते. स्वातंत्र्यदिनी कोण कोणत्या जिल्ह्यामध्ये ध्वजारोहण करणार याची यादी सोमवारी प्रसिद्ध झाली. यामध्ये रायगडमध्ये अदिती तटकरे, नाशिकलमध्ये गिरीश महाजन यांना ध्वजारोहणाचा मान देण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक जिल्ह्याचे पालकमंत्री यांना हा मान दिला जातो. यावर उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले की, जी यादी प्रसिद्ध झाली आहे ती पालकमंत्री पदाची यादी नाही. प्रत्येक जिल्ह्यात ध्वजारोहण कोण कुठे करणार आहे याबद्दलची ती यादी आहे.

## वाढवण विकासासाठी सिंगापूरने सहकार्य करावे – मुख्यमंत्री

■ **उरण**

भारत आणि सिंगापूर यांच्यातील सागरी व्यापार, पायाभूत सुविधा, डिजिटायझेशन, डेटा सेंटर्स आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील वाढते सहकार्य आणि अनेक सामंजस्य करारांमुळे आर्थिक बंध अधिक दृढ होत असून यामुळे विशेषतः महाराष्ट्र आणि सिंगापूरमधील संबंधांना नवीन आयाम मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. तसेच वाढवण बंदर विकासासाठी सहकार्य करावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी आणि इंडियन पोर्ट्स असोसिएशन यांच्या वतीने जेएनपीए बिझनेस सेंटर, उरण



येथे ग्रीन अँड डिजिटल मेरिटाईम कॉरिडॉर्स लिडर्स डायलॉग आयोजित करण्यात आला होता, यावेळी ते बोलत होते. मंचावर सिंगापूरचे उपपंतप्रधान गान किम येंग, सिंगापूर परिवहन मंत्री जेफरी सियो उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएनपीए) येथील नवीन पीएसए टर्मिनलचे लवकरच उद्घाटन होणार असून ही अत्याधुनिक सुविधा जेएनपीएच्या ५०% कंटेनर क्षमतेचे नियोजन करेल तसेच भारताच्या जागतिक व्यापाराला चालना देईल. या सुविधेमुळे भारताची सागरी शक्ती अधिक सक्षम होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सिंगापूरने केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी विशेष आभार मानले.

राज्यातील वाढवण हा भारतातील सर्वात मोठा बंदर प्रकल्प असून तो वेळेत पूर्ण होईल आणि महाराष्ट्र तसेच भारताला सागरी महासत्ता म्हणून स्थापित करेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रकल्पामुळे भारताच्या सागरी पायाभूत सुविधांना नवीन दिशा मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

## मुंबई महापालिका आपल्याकडे होती आणि यापुढेही आपल्याकडेच राहणार

■ **मुंबई**

मुंबई महानगरपालिका सतत आपल्याकडे होती आणि यापुढेही आपल्याकडेच राहणार, असं शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले म्हणाले आहेत. मुंबई-महाराष्ट्राचा लोकप्रिय सण असलेला गणेशोत्सव काही दिवसांवरच येऊन ठेपला आहे. असे असतानाही पालिका आणि सरकारने मुंबईतील गणेशोत्सव मंडळांच्या अनेक समस्या अद्याप सोडवलेल्या नाहीत. त्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक मंगळवारी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात पार पडणार पडली. यावेळी बोलताना ते असं म्हणाले आहेत.

यावेळी मुंबईतील गणेशोत्सव



मंडळ पदाधिकारी बैठकीत उपस्थित लोकांना संबोधित करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, लोकमान्य टिळक यांनी सुरु केलेली परंपरा तुम्ही (गणपती मंडळांनी) नुसती कायम ठेवली नाही तर, जल्लोषात कायम ठेवली. किमान शंभर वर्ष होऊन गेली, मात्र कुठे ही उत्साहाला ओहोटी लागली, असं दिसलं नाही. या सर्व काळात अनेक संकटे आली. त्यातली काही नैसर्गिक होती, काही सरकारी पण आहे. विशेषतः कोरोनाचा काळ खूप भयानक होता. कोरोना जर नसता तर, मी मुख्यमंत्री होतो. तुमचे प्रश्न मी त्याचवेळी सोडून टाकले असते.

उद्धव ठाकरे म्हणाले की, मला नेहमी वाटतं की, लोकमान्य यांनी आपल्या सणांची चळवळ केली. त्या चळवळीतून स्वातंत्र मिळवण्यासाठी जी एकजूट हवी होती, ती झाली. स्वातंत्र्यानंतर चळवळीचे उत्सवात रूपांतर झालं. गर्दी तर आजही होते, मात्र नुसत्या गर्दीला अर्थ नाही, त्या गर्दीमध्ये एक बांधीवपणा पाहिजे, एकजूट हवी. 2010 साली मला आठवत आहे की, डेंग्यू आणि मलेरियाचा थायमन होता. आपण येथेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना बोलावलं होतं. पान 8 वर

## अजित पवारांनी जनाची नाही तर मनाची तरी लाज बाळगावी!

■ **धाराशीव**

महायुतीत काही आलबेल नाही असं दिसत आहे. कारण भाजप नेते आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. अजित पवारांनी जनाची नाही तरी किमान मनाची तरी लाज बाळगावी, असे विधान विखे पाटील यांनी केले आहे. त्यामुळे महायुतीतली धुसफूस पुन्हा समोर आली आहे.

धाराशीवमध्ये एका कार्यक्रमात राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी इथेनॉल धोरण लागू केले आणि साखर कारखान्यांना जीवदान दिले. पण अजित पवार



यांच्या साखर कारखान्यात पंतप्रधान मोदींचे आभार मानणारा एकही बॅनर लावला गेला नाही. इतकंच नाही तर कारखान्यात सभा घेऊन अभिनंदनाचा एक ठरावही मंजूर करण्यात आला नाही. अजित पवार यांनी जनाची नाही तर किमान मनाची तरी लाज बाळगावी, अशी टीका विखे पाटील यांनी केली आहे.

## पिक्चर अभी बाकी है !

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांनंतर राहुल गांधी चांगलेच आक्रमक झाले आहेत. मंगळवारी 'पिक्चर अभी बाकी है' म्हणत राहुल गांधींनी पुन्हा एकदा निवडणूक आयोगाला इशारा दिला आणि आम्ही संविधानाचे रक्षण करत आहोत मात्र निवडणूक आयोग 'एक व्यक्ती, एक



मत' हे कर्तव्य बजावत नाही, असे म्हणत आयोगावर टीकाही केली.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी संसदेबाहेर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी भाजपशी संगनमत करून निवडणूक आयोगाने मतदार यादीत छेडछाड केल्याचा आरोप त्यांनी केला. पान 8 वर


## आमदारांना 10 महिन्यांपासून निधी नाही - आ. गायकवाड

### मंत्री सरनाईकांनी दावा फेटाळला

■ **मुंबई**

महायुती सरकारच्या काही लोकप्रिय योजनांमुळे आमदारांना मागील 10 महिन्यांपासून कोणताही निधी मिळाला नसल्याचा दावा सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे सत्ताधारी महायुतीच्या गोटात एकच खळबळ माजली आहे.

महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट निर्माण झाल्याची चर्चा आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना दरमहा 1500 रुपयांचे अर्थसहाय्य केले जाते. महायुती सरकारची ही योजना अत्यंत महत्त्वकांक्षी असली तरी ती चालवण्यासाठी सरकारला मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे सरकार कोणत्या ना कोणत्या विभागाचे पैसे वळवून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करत आहे. या प्रकरणी राज्याच्या राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी आमदारांना निधी मिळण्यात पान 8 वर



**भाईंदर -** कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुंबई जिल्हा अध्यक्षपदी विद्या प्रभू यांची निवड झाली आहे. विद्यमान अध्यक्ष मनोज वराडे आणि विद्या प्रभू यांच्यात लढत झाली. त्यात विद्या प्रभू विजयी झाल्या.यावेळी मुंबई जिल्ह्याची कार्यकारिणीही निवडण्यात आली. केंदीय समितीवर जिल्हा प्रतिनिधी म्हणून जगदीश भोवड यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी एकनाथ तांबवेकर, सचिवपदी संपदा मुळगावकर, खजिनदारपदी ज्योती कपिले यांची निवड झाली आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून मधुमंजिरी गटणे, रविकिरण पराडकर, श्रीकांत म्हात्रे, प्रशांत राऊत, वंदना पाटील आणि विकास वराडकर यांना नेमण्यात आले. निवडणूक अधिकारी म्हणून अरुण तुकाराम मोर्ये यांनी काम पाहिले.



## थोडक्यात

### कुर्ला पश्चिमेत अंगारकी संकष्टी चतुर्थी साजरी

**मुंबई:** कुर्ला पश्चिम स्टेशनजवळील श्री जागृत विनायक मंदिर ट्रस्ट तर्फे अंगारकी संकष्टी चतुर्थी मोठ्या श्रद्धा व उत्साहाने साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच मंदिरात भक्तांची रांग लागली होती. सकाळी व संध्याकाळी विशेष पूजन व आरती आयोजित करण्यात आली होती. दिवसभर गणपती बाप्पाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.संपूर्ण परिसर फुलांच्या सजावटीने, दिव्यांच्या रोषणाईने आणि मंगल वादनाने सजला होता. स्थानिक रहिवासी तसेच दूरवरून आलेल्या भाविकांनी मंदिरात येऊन अंगारकी संकष्टी चतुर्थीचा आनंद घेतला. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

### गिरणी कामगार मुलांचा गुणगौरव

**मुंबई:** राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे आद्य संस्थापक ऋषितुल्य गं.द.आंबेकर यांचा जयंतीदिन सोहळा दि.२१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वाजता महात्मा गांधी सभागृहात संपन्न होत आहे. समारंभाचे अध्यक्ष स्थान संघटनेचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर भूषविणार असून,या औचित्याने इयत्ता दहावी,बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा शैक्षणिक सहाय्याने गुणगौरव होणार आहे.समारंभाला दैनिक मुंबई सकाळचे ब्युरोचिफ विनोद राऊत प्रमुख म्हणून उपस्थित रहाणार आहेत. यंदा गिरणी कामगारांच्या नातवंडांचाही सन्मान होणार आहे. त्यासाठी इयत्ता १० वी आणि १२ वी मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ८० टक्के गुणाची,तसेच अन्य तत्सम क्षेत्रातील उच्च पदवीधर विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याची अट आहे. संघटनेच्या वतीने गिरणी कामगार मुलांचा शैक्षणिक प्रोत्साहन देणारी ही प्रथा सुरू करण्यात आली त्याला जवळपास ३५ वर्षापेक्षा अधिक काळ लोटला आहे,असे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी म्हटले आहे. १५ जुलै पासून सुरू करण्यात आलेल्या आंबेकर शैक्षणिक सहाय्या अंतर्गत,येत्या १५ ऑगस्ट पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

### रामदास आठवले 13 ऑगस्टपासून लंडन दौऱ्यावर

**मुंबई:** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे येत्या बुधवार दिनांक 13 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 2 वाजता मुंबईतुन लंडनला रवाना होणार आहेत.त्यांच्या समवेत रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अविनाश कांबळे हे सुध्दा लंडन दौऱ्यावर रवाना होणार आहेत. केंद्रीयराज्यमंत्री ना.रामदास आठवले हे लंडन दौऱ्यात लंडन येथील भारतीय दुतावास येथे 15 ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करणार आहेत.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# आमदार स्नेहा दुबे यांच्या इशाऱ्यानंतरही अनधिकृत बांधकामांचा वेग कायम

## भाजपाचे पदाधिकारी- कार्यकर्तेच अनधिकृत बांधकामांत गुंतलेले? मग विकास होणार कसा? नागरिकांचा संतापजनक सवाल

प्रतिनिधी
■ वसई

वसई विधानसभा क्षेत्राच्या विद्यमान आमदार स्नेहा दुबे - पंडित यांनी यापुढे वसई विधानसभा क्षेत्राच्या हद्दीत एकही अनधिकृत बांधकामाची विट रचू देणार नाही,असा गर्भित इशारा दिला होता. तसेच पावसाळी अधिवेशनात देखील त्यांनी अनधिकृत बांधकामां संदर्भात टीकेची जोड उठवली होती. त्यामुळे आशेचा एक मोठा किरण निर्माण झाला होता. परंतु, वसई विधानसभा क्षेत्रात भाजपाचे काही पदाधिकारी व कार्यकर्ते अनधिकृत बांधकामांत गुंतले असल्याने वसई विधानसभा क्षेत्राचा विकास होणार तरी कसा असा संतापजनक सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

सत्ता परिवर्तनानंतर वसईच्या आमदार स्नेहा दुबे- पंडित यांनी अनधिकृत बांधकामासंदर्भात आक्रमक भूमिका घेतली आहे. वेळोवेळी पालिका अधिकाऱ्यांना सूचना व कडक विचारात देऊन अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण आणण्याची त्यांची भूमिका खमकी राहिलेली आहे. परंतु मध्यंतरी ज्या पालिका आयुक्तांवर ईडिकडून आरोप झाले. त्याच आयुक्तांच्या निरोप समारंभात त्यांनी हजेरी लावल्याने त्यांच्यावर देखील टिकेची झोड उठली होती. आता वसई विधानसभा क्षेत्रात अनधिकृत बांधकामाची विटही रचू देणार नाही, असा इशारा देणाऱ्या आमदार स्नेहा दुबे - पंडित यांच्या गर्भित इशाऱ्यालाच पालिका अधिकाऱ्यांनी वाऱ्यावर सोडले आहे. त्यामुळे वसई विधानसभा क्षेत्राच्या हद्दीत भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामात गुंतलेले आहेत ही बाब आमदार स्नेहा दुबे - पंडित यांच्या निदर्शनास येत नाही की कसे? असा खोचक सवाल वसईतील नागरिकांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, पावसाळयात कोणत्याही नागरिकांना बेघर करू नका असे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. या आदेशाचे तंतोतंत पालन पालिका प्रशासनाकडून करतानाच भूमाफीयांना अनधिकृत बांधकामे बांधा आणि त्यात तात्काळ माणसे भरा, असे अनाहूत सल्ले दिले जात आहेत. त्यामुळे अनधिकृत बांधकामावर नियंत्रण येण्याऐवजी ज्या अनधिकृत बांधकामांशी भाजपच्या पदाधिकाऱ्यांचा संबंध आहे, ती बांधकामे मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहेत. त्यामुळे या सर्व प्रश्नाकडे आता आमदार स्नेहा दुबे- पंडित या कोणत्या नजरेने पाहणार? असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे

सत्ता परिवर्तनानंतर अनधिकृत बांधकामे नियंत्रणात ठेवणार अशी आश्वासने भाजपच्या दोन्ही आमदारांनी आमदार होण्यापूर्वी दिली होती. परंतु आमदार होताच अनधिकृत बांधकामांचा मुद्दा निकाली काढण्यात दोन्ही आमदारांना अपयश आले आहे. तसेच सध्याच्या मतचोरीच्या प्रकारामुळे भाजपच्या प्रतिमेला देखील मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत त्याचा फटका भाजपला बसणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# नायगावच्या महिला असुरक्षित

# 70 दिवसात 19 बलात्कार, 20 विनयभंग, 3 हत्या

## कायदा- सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी
■ मुंबई

नायगाव पूर्व परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिकीकरणाचा वेग वाढू लागला आहे. अनधिकृत बांधकामे झपाट्याने वाढत असून येथे अनोळखी परप्रांतीय नागरिकांचा वेग ही वाढू लागला आहे. परप्रांतीय नागरिकांमध्ये सराईत व भुरट्या गुन्हेगारी वृत्तीचे परप्रांतीय नागरिक आश्रयाला आल्याने या भागाची गुन्हेगारी देखील वाढू लागली आहे. त्यामुळे आपसूकच महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. धक्कादायक बाब अशी गेल्या ७० दिवसात नायगाव पूर्व परिसरात घडलेल्या गुन्हेगारीच्या आलेखावर एक नजर टाकल्यास चिंतेची बाब समोर दिसून येते. गेल्या ७० दिवसात १९ बलात्कार २० विनयभंगाच्या तक्रारी तर ३ हत्या असे गुन्हे नायगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे येथील कायदा- सुव्यवस्थेचा प्रश्नच ऐरणीवर आला आहे.

नायगाव पूर्व परिसरातील गणेश नगर, जे.वी.सारा परिसर, एचडीएफसी बँकेच्या पाठीमागे, म्हसोबा नगर, म्हात्रेवाडी, परेरानगर, बापाणे, कामण,पोमण, चिंचोटी, मालजीपाडा, ससूनवघर, ससूपाडा या परिसरात मोठ्या प्रमाणात परप्रांतीय नागरिकांची वस्ती वाढू लागली आहे. स्थानिक नागरिकांची संख्या झपाट्याने खाली येत असून स्थानिकांची संख्या केवळ २०% इतकी उरली आहे तर परप्रांतीय मात्र ८०% इतक्या वेगाने फुगली आहे. त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीचा वेग वाढला असून परप्रांतीयांची दादागिरी देखील वाढू लागली आहे. गेल्या ७० दिवसात घडलेल्या गुन्हेगारीवर एक नजर टाकल्यास येथील कायदा- सुव्यवस्था उच्च प्रमाणात वाढत असून पोलीस प्रशासनाने गांभीर्यपूर्वक कार्यवाही करण्याची गरज व्यक्त होऊ लागली आहे.

### नवीन आलेले पोलीस कर्मचारी आर्थिक वसुलीत मग्न?

नायगाव पूर्व परिसरात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीचा वेग वाढत असताना या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे हे पोलिसांचे कर्तव्य असताना नायगाव पोलीस ठाण्यात नव्याने आलेले कर्मचारी हे आर्थिक वसुलीत गुंतले असल्याचे संतापजनक चित्र दिसून येते. एखाद्या गुन्हा घडल्यानंतर त्यावर प्रकर्षाने कार्यवाही करणे गरजेचे असताना सेटलमेंट करण्याकडे पोलिसांचा कल असल्याने पोलिसांच्या आर्थिक चिरीमिरी घेण्याच्या वृत्तीमुळे नायगाव पूर्व परिसराची गुन्हेगारी बोकाळली असल्याचा आरोप येथील सुज्ञ नागरिकांनी केला आहे.

# महसूल विभागातील भ्रष्टाचारविरोधात 'मी वसईकर अभियान'ची हाक

## आज वसई प्रांत कार्यालयावर धरणे आंदोलन

प्रतिनिधी
■ वसई

महसूल विभागातील वाढता भ्रष्टाचार, तलाठ्यांचा मनमानी कारभार, दलालराज आणि नागरिकांना न्याय मिळण्यात होणारा विलंब याविरोधात 'मी वसईकर अभियान'तर्फे आज (बुधवार) सकाळी ११ वाजता वसई उपविभागीय अधिकारी कार्यालयावर (प्रांत कार्यालय) धरणे आंदोलन उभारण्यात येणार आहे. संस्थापक अध्यक्ष मिलिंद वामन खानोलकर यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात महसूल विभागाला पारदर्शक व जबाबदार बनवण्यासाठी ९ ठोस मागण्या एकमुखाने मांडल्या जाणार आहेत.

या मागण्यांमध्ये तलाठी व तहसीलदार कार्यालयांना ऑनलाइन जोडणी करून मनमानीला आळा घालणे, जमीन मिळकतीशी संबंधित फेरफार प्रकरणात संबंधितांना नोटीस न देता होणारा त्रास थांबवणे, महत्त्वाच्या महसूल प्रकरणांचा निपटारा मेरिटवर करणे, नकाशे व फेरफार नोंदी मिळवताना शेतकऱ्यांची आर्थिक लूट रोखणे, महसूल विभागातील भ्रष्टाचार आणि दलालराज संपुष्टात आणणे, कार्यालयीन कामकाजात पूर्ण पारदर्शकता आणणे, आदिवासी व सामान्य नागरिकांसाठी 'ई-सेवा' सुविधा सुरू करून त्यांचे आर्थिक शोषण थांबवणे, सरकारी जमिनीवरील अतिक्रमण तसेच बेकायदेशीर माती व रेती उपसा रोखणे, आणि नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही सुरू करणे या सर्वांचा समावेश आहे. "महसूल विभागाचा बेजबाबदार आणि भ्रष्ट कारभार संपवण्यासाठी जनतेचा दबाव निर्माण करणे हाच या आंदोलनाचा उद्देश आहे. आजपर्यंत दुर्लक्षित झालेल्या नागरिकांच्या हक्कांसाठी हा निर्णायक लढा आहे, असे खानोलकर यांनी सांगितले.

या धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक, शेतकरी, आदिवासी व सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग अपेक्षित असून, महसूल विभागाविरोधात जनतेचा प्रचंड संताप प्रांत कार्यालयासमोर उसळण्याची शक्यता आहे.

### बनावट नोटांची विक्री करणारी टोळी गजाआड

**मुंबई:** भारतीय चलनातील नोटांच्या बदल्यात बनावट नोटा देऊन फसवणूक करणाऱ्या एका टोळीला गुन्हे शाखेने सोमवारी विक्रोळी परिसरातून अटक केली. पोलिसांनी या आरोपींच्या ताब्यातून सहा मोबाइल आणि मोठ्या प्रमाणात बनावट नोटा हस्तगत केल्या. मुंबई शहरात एक मोठी टोळी बनावट नोटांची विक्री करीत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष ६ च्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेने तपास करीत या टोळीशी बनावट ग्राहक बनून संपर्क साधला. त्यावेळी २५ हजारात एक लाख रुपयांच्या बनावट नोटा देण्यात येत असल्याची माहिती आरोपींनी दिली.

# वसईच्या ग्रामीण भागात मुसळधार

## ग्रामीण भागात पुराचे संकट

प्रतिनिधी
■ वसई

वसईच्या ग्रामीण भागात पावसाने गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार हजेरी लावली आहे. तर शहरी भागात मात्र पावसाने पाठ फिरवली आहे. त्यामुळे ग्रामीण भागात तानसा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून ग्रामीण भागावर पुराचे संकट आहे.

जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने चांगली हजेरी लावल्यामुळे रखडलेला लावणी हंगाम आता पूर्ण झाला आहे. त्यामुळे शेतकरी राजा लावणी हंगामासारख्या कामातून मोकळा झाला आहे. सध्या शहरी भागात पावसाने पूर्णपणे पाठ फिरवली असली तरी ग्रामीण भागात मात्र



मुसळधार पावसाची हजेरी सुरूच आहे. शनिवारपासून पावसाने वसईच्या ग्रामीण भागात मुसळधार हजेरी लावली असून गेल्या तीन दिवसात मोठ्या प्रमाणात येथे पाऊस कोसळत आहे. धरण क्षेत्रात पावसाची हजेरी दमदार असून या वेळेला पावसाचे प्रमाण समाधानकारक व त्यापेक्षा जास्त झाल्याने पाण्याचा प्रश्न मात्र मिटण्यास मदत झाली आहे. परंतु नुकतेच भात लागवड पूर्ण झाली असल्याने व पावसाने मुसळधार हजेरी लावली असल्यामुळे पुराचे संकट कोसळून भात शेती संकटात सापडण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, मंगळवारी पावसाने दुपारनंतर विश्रांती घेतली आहे. परंतु, पाऊस एक-दोन दिवस कोसळणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागावर पुराचे संकट आहे.

# माजी नगरसेवक महेश पाटीलसह शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

## बहुजन विकास आघाडीला आणखी एक मोठा धक्का

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरारच्या राजकारणात भाजपाने पुन्हा एकदा जोरदार दम दाखवत बहुजन विकास आघाडीला मोठा धक्का दिला आहे. बहुजन विकास आघाडीचे माजी नगरसेवक महेश पाटील यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश करून आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणे हलवून टाकली आहेत.

### वसईच्या राजकारणात खळबळ




हा भव्य प्रवेश सोहळा १२ ऑगस्ट रोजी मुंबईतील नरीमन पॉइंट येथील भाजप प्रदेश कार्यालयात पार पडला. यावेळी प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार राजन नाईक, आमदार स्नेहा दुबे, जिल्हाध्यक्षा प्रज्ञा पाटील यांच्या उपस्थितीत महेश पाटील यांनी भगवा पताका हाती घेतला.महेश पाटील हे काही दिवसांपासून भाजपात येण्यासाठी इच्छुक होते. त्यासाठी ते आमदार राजन नाईक यांच्या संपर्कात होते. नाईक यांनी जिल्हाध्यक्षा प्रज्ञा पाटील यांच्यासोबत चर्चा करून हा प्रवेश सोहळा अंतिम केला.महेश पाटील यांच्यासह राजेश ठाकूर, सविता ठाकूर, रवी पाटील, राजेश पाटील, दिलीप भोईर, हर्ष म्हात्रे, ॲड. धवल चोरगे, ॲड. जनमेजय प्रजापती, संदीप फाटक यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजप प्रवेश केला.या प्रसंगी प्रदेश महामंत्री माधवी नाईक, आमदार प्रसाद लाड, माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, ज्येष्ठ नेते श्याम पाटकर, वसई विधानसभा प्रमुख मनोज पाटील, जिल्हा महामंत्री मनोज बारोट यांसह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# बेलासिस उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीला वेग

प्रतिनिधी
■ मुंबई

ताडदेव - नागपाडा आणि मुंबई सेंट्रल स्थानकाला जोडणा-या बेलासिस उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीला वेग आला आहे. ब्रिटिशकालीन १३० वर्षे जुना बेलासिस पूल पाडून त्याची पुनर्बांधणी केली जात आहे. पुलाचे रेल्वे हद्दीतील काम पश्चिम रेल्वे करत असून पुलाच्या पोहोच रस्त्याची उभारणी बृहन्मुंबई महानगरपालिका करत आहे. या अंतर्गत पहिल्या टप्प्यात रेल्वे कंत्राटदाराने ३६ मीटर स्पॅनच्या एकूण १२ तुळया स्थापित (Girder Launching) करण्याची कार्यवाही नुकतीच पूर्ण केली आहे.

आता, रेल्वे प्राधिकरणाने तुळयाचे मजबुतीकरण पुलाच्या प्रवास पृष्ठभागाची रचना करणे, स्लॅब कास्टिंग इत्यादी कामे हाती घेतली आहे. यासाठी वाहतूक व वीज पुरवठा या दोन्ही घटकांमध्ये ४० ब्लॉक घेतले जाणार आहेत. एकूणच, बेलासिस पुलाचे बांधकाम नियोजित कालावधीपूर्वी म्हणजेच ३१

### पुलाचे बांधकाम नियोजित 31 डिसेंबर 2025पर्यंत पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे उद्दिष्ट्य

डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे उद्दिष्ट्य आहे.

मुंबई सेंट्रल स्थानकानजीक रेल्वे मार्गावर केबलआधारित पूल उभारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट (महारेल) यांच्याशी करार केला आहे. बेलासिस पूल प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी एप्रिल २०२६ पर्यंत आहे. मात्र, या पुलाचे बांधकाम नियोजित कालावधीपूर्वी पूर्ण करून डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत वाहतुकीस खुला करण्यासाठी प्रयत्नशील रहावे, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

# कासा येथे सांस्कृतिक कार्यक्रमांनी जागतिक आदिवासी दिन साजरा

प्रतिनिधी
■ डहाणू

पालघर जिल्हा हा राज्यातील प्रमुख आदिवासी बहुल जिल्हा असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी गौरव दिन मोठ्या उत्साहात आणि ऐतिहासिक जल्लोषात साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील कासा, तवा, डहाणू, वानगाव, बोईसर, मनोर, पालघर, तलासरी, जव्हार, विक्रमगड आदी भागातून हजारो आदिवासी बांधव पारंपरिक वेशभूषेत, ढोल-ताशांच्या गजरात आणि वाजत्या पारंपरिक वाद्यांसह रॅलीत सहभागी झाले.

कासा येथे कासा उत्सव समितीच्या वतीने सकाळी चारोटीहून गाजत-गाजत रॅलीला सुरुवात झाली. रॅलीत सहभागी झालेल्या महिलांनी व पुरुषांनी पारंपरिक नृत्य आणि गाणी सादर करत सामाजिक ऐक्याचा आणि आदिवासी संस्कृतीचा संदेश दिला. रॅलीचा समारोप कासा-सायवान येथील बिरसा मुंडा चौकात झाला. येथे आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा



यांच्या प्रतिमेला श्रीफळ अर्पण करून व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. "आत्मनिर्णयाचा अधिकार, अन्न सुरक्षा आणि सार्वभौमत्वाचा मार्ग". अधिवक्ता अँड. विराज गडग यांनी आदिवासी हक्क, संस्कृती आणि आदिवासी जमिनीबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची सविस्तर माहिती समुदायाला दिली. माजी जिल्हा परिषद सदस्य जयेंद्र दुबळा यांनी अन्न सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले, तर समाजकल्याण सभापती पांडुरंग बेलकर यांनी जागतिक आदिवासी दिनाचे ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व विषद केले.

कार्यक्रमात आदिवासी समाजातील गरोदर महिलांची प्रसूती सेवेत मोलाची भूमिका बजावणाऱ्या माल्ही घाटाळ यांचा सत्कार शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. या प्रसंगी आदिवासी एकता सेवा संस्थाचे सूत्रसंचालन अखिल आदिवासी पत्रकार संघटनेचे निलेश कासट यांनी केले.तसेच मोठ्या संख्येने उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आदिवासी बांधव उपस्थित होते.कार्यक्रमाचा शेवट पारंपरिक नृत्य आणि गीतांनी झाला, ज्यातून आदिवासी समाजाच्या एकतेचा, सांस्कृतिक अभिमानाचा आणि हक्कासाठीच्या लढ्याचा संदेश देण्यात आला.

**CHANGE OF NAME**

I GURVINDER PREM BHATTI R/ AT KRISHNA NIWAS 4TH FLOOR MHATRE AALI JAGDISH PATIL MAIDAN BALRAMWADI GHANSOLI NAVI MUMBAI-400 701 I DECLARE THAT I have changed my name from BHATTI GURVINDER PREMKUMAR to GURVINDER PREM BHATTI as per Affidavit.

**CHANGE OF NAME**

I PREM SUNDERDAS BHATTI R/ AT KRISHNA NIWAS 4TH FLOOR MHATRE AALI JAGDISH PATIL MAIDAN BALRAMWADI GHANSOLI NAVI MUMBAI-400 701 I DECLARE THAT I have changed my name from BHATTI PREMKUMAR SUNDERDAS to PREM SUNDERDAS BHATTI as per Affidavit.

**जाहीर सूचना**

अशिल श्रीमती दीपिका दिलीपकुमार वाडिवकर, राहणाऱ्या फ्लॅट क्रमांक १८-अ, शिवाई को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई ४०० ०२८. सदर फ्लॅट त्यांच्या मृत सासू अवदाबाई रामचंद्र वाडिवकर यांच्या नावावर आहे आणि सदर फ्लॅटच्या संदर्भात शिवाई को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेडचे सदस्यत्व त्यांच्या नावावर आहे.) शेअर सर्टिफिकेट क्रमांक १३, शिवाई को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लिमिटेडचे ५ पूर्ण भरलेले शेअर्स आहेत, ज्यांचे क्रमांक क्रमांक ६६ ते ७० (यापुढे 'उक्त शेअर्स' असे म्हटले जाईल) आहेत. माझी क्लायंट श्रीमती दीपिका दिलीपकुमार वाडिवकर, मृत अवदाबाई रामचंद्र वाडिवकर यांची कायदेशीर वारस आहे आणि सदर फ्लॅटमध्ये राहते आणि सदर फ्लॅटचा त्यांचा विशेष वापर आणि व्यवसाय आहे. सदर फ्लॅट आणि शेअर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तींनी लक्षात घ्यावे की माझ्या क्लायंट श्रीमती. मृत अवदाबाई रामचंद्र वाडिवकर यांच्या इतर वारसांनी माझ्या क्लायंटच्या संमतीशिवाय सदर फ्लॅट विक्री, भाडेपट्टा, धारणाधिकार, भेटवस्तू, सुविधा, देवाणघेवाण, ताबा, वारसा, वारसा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हाताळण्याचा प्रयत्न केल्यास दीपिका दिलीपकुमार वाडिवकर यांना तीव्र आक्षेप आहे आणि जर मृताचा कोणताही वारस तृतीय पक्षासोबत कोणताही व्यवहार करत असेल तर माझा क्लायंट सदर व्यवहारासाठी जबाबदार राहणार नाही आणि तो माझ्या क्लायंट आणि सोसायटीवर बंधनकारक राहणार नाही.

सही/-
डी. के. राजे, वकील कार्यालय: ग्रा. फ्लोअर, ३८५, जे.एस.एस. रोड, चिरा बाजार, मुंबई - ०२.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Thirty
Issu - 53
R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे**, E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- तीसावे
अंक - ५३
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

**मुंबई :** शिकलगार सहकारी पत संस्थेचा ४८ वा वर्धापन दिन सोमवारी संस्थेच्या कुर्ला पूर्व येथील एस जी बर्वे मार्गावरील पतपेढीच्या मुख्यालयात साजरा करण्यात आला. या वेळी संस्थेच्या संकेत स्थळाचे उद्घाटन अध्यक्ष नौशाद शिकलगार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर व खातेदार उपस्थित होते.



# आम्ही काय खावे हे सांगण्याचा अधिकार प्रशासनाला नाही

## नॉन-व्हेज बंदीला आदित्य ठाकरेंचा कडाडून विरोध

**प्रतिनिधी**
**मुंबई**

स्वातंत्र्य दिनानिमित्त कल्याण-डोंबिवली पालिका क्षेत्रातील सर्व लहान आणि मोठ्या जनावरांचे कत्तलखाने बंद ठेवण्यात येणार आहेत, असे आदेश कल्याण-डोंबिवली महापालिकेकडून जारी करण्यात आले. त्यानुसार 15 ऑगस्टला रात्री 12 पासून 15 ऑगस्ट रात्री 12 वाजेपर्यंत पर्यंत प्राण्यांची कत्तल करू नये, असे आदेश महापालिकेने दिले आहेत. शिवाय मांस विक्रीही या दिवशी करू नये असे महापालिकेने सांगितले आहे. जनावरांची कत्तल आणि मांसविक्री केल्यास कडक कारवाई



करण्यात येईल असा इशारा देण्यात आला होता.

नॉन-व्हेजवर बंदी प्रकरणी प्रश्न विचारला असता शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे म्हणाले, आम्ही याचा कडकडून विरोध करू. 15 ऑगस्टच्या दिवशी व्हेज खा नाहीतर नॉन व्हेज खा हे सांगण्याचा अधिकार या महानगरपालिकांना नाही आणि आयुक्तांनाही नाही. लोकांनी काय करावे, काय करू नये, काय खावे किंवा काय खाऊ नये हे त्यांना सांगण्याचा अधिकार नाही.

अनेक लोक व्हेज खातात त्यांना विरोध नाही. पण जे आमच्यासारखे नॉन व्हेज खाणारे लोक आहेत, जे कल्याण डोंबिवलीमध्ये आगरी-कोळी बांधव आहेत ते काय करणार त्या दिवशी? आणि आमच्या राज्यात येऊन तुम्ही हे व्हेज खाण्याचे लादत आहात का? असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, बॅलेटवरच निवडणुका व्हाव्यात म्हणून एकेकाळी भाजप सुद्धा अग्रेसर होता. आता त्यांनी जिंकायचे रसायन काढले आहे त्यामुळे तुम्ही आता बॅलेट काय चंद्रावर पण मतदान घ्या तिथे जाऊन लोक मतदान करून येतील अशी सिस्टम त्यांनी बसवली आहे. शकुन राणे नामक व्यक्ती 5 वेळा मतदान करत आहेत, एक बाई आहेत 124 वर्षांच्या, जगातल्या सर्वात वयस्कर महिला, दिसतात 25 सारख्या पण वय आहे 124. हे असे सगळे घोळ आम्ही पकडले आहेत.

**निवडणूक आयोग व्हीव्हीपॅट काढण्याच्या तयारीत**

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आता व्हीव्हीपॅट सुद्धा काढून टाकण्याच्या तयारीत निवडणूक आयोग आहे. आता निवडणूक आयोगाने ठरवले पाहिजे की निवडणुका घ्यायच्या आहेत की त्यांच्या ओळखीतले जे लोक आहेत त्यांना जाहीर करून टाकायचे की हेच जिंकले. निवडणूक आयोग दिल्लीत बसते, निर्लज्जपणा हा दिल्लीतून होतो, असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

# डॉ. आंबेडकर यांचे मूळ घर तसेच आंबडवे परिसर विकसित करण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार करा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

रत्नागिरी जिल्ह्यात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ घर व आंबडवे परिसर विकसित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी पहिला व दुसरा टप्पा असे प्रस्ताव तयार करावेत, असे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित बैठकीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ घर व आंबडवे परिसर विकसित करण्याबाबतआयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट बोलत होते. यावेळी राज्यमंत्री योगेश कदम, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, दूरदृश्यप्रणालीद्वारे आयुक्त दीपा मुधोळकर, रत्नागिरीचे जिल्हाधिकारी



एम.देवेंदरसिंह उपस्थित होते.

मंत्री शिरसाट म्हणाले की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ घर व आंबडवे परिसराचा परिपूर्ण विकास करण्यासाठी तातडीने जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी. स्मारक तसेच परिसर विकासासाठी बार्टीच्या सहाय्याने शैक्षणिक उपक्रम देखील या परिसरात सुरू करावे. स्मारकासाठी लागणाऱ्या जागेचे भूसंपादन करण्यासाठी स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन कार्यवाही करावी. ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे असे हे ठिकाण असल्याने त्या दृष्टीने या परिसरात काम करण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची स्थापना करून सर्व कामांची माहिती या समितीसमोर सादर करावी, अशा सूचना मंत्री शिरसाट यांनी यावेळी दिल्या.

स्मारक उभारण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करणे, स्मारकारसाठी आवश्यक जमीनीचे भूसंपादन करणे, वास्तुविशारद नेमणूक, स्मारकाचे बांधकाम, प्रकल्पाचे टप्पे, मौजे आंबडवे येथील नागरिकांनाच्या पुनर्वसनाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. सर्व कामांसाठी दोन टप्प्यात प्रस्ताव सादर करावेत, असे मंत्री शिरसाट यांनी सांगितले.

# गडनरळ ग्रामस्थांचा ऐतिहासिक ठराव एमआयडीसीला एकमुखी नकार!

**प्रतिनिधी**
**मुंबई**

गडनरळ सामाजिक विकास संस्था, मुंबई विभाग यांच्या सर्वसाधारण सभेत आज गावाचे भविष्य ठरवणारा ऐतिहासिक ठराव एकमुखाने मंजूर झाला. सभेत गावातील सर्व ग्रामस्थ, मुंबईतील चाकरमानी, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन प्रस्तावित वाटद एमआयडीसी प्रकल्पाला ठाम नकार दिला.



अध्यक्षांच्या परवानगीने मांडण्यात आलेल्या ठरावाला एकाही सदस्याने विरोध न करता जोरदार टाळ्यांच्या गजरात मंजुरी दिली. वृत्तपत्रात काही चुकीच्या बातम्या दिल्या जात आहेत. पैश्याच्या जोरावर चुकीच्या, गाव ९९% एमआयडीसी विरोधात असताना देखील वृत्तपत्रात खोट्या बातम्या दिल्या जात आहेत, ह्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अनेक वक्त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले की, ह्या प्रकल्पात केवळ जमिनींचा प्रश्न नाही, तर गावाचे अस्तित्व, संस्कृती आणि पुढील पिढ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. सभेतील महत्त्वाचे मुद्दे: वाडीनुसार एमआयडीसी विरोधी जनजागृती मोहीम राबविण्याचा निर्धार युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांचा एकत्रित सहभाग वाढवण्यावर भर कायदेशीर, लोकशाही व शांततामय मार्गाने संघर्ष चालू ठेवण्याचा संकल्प शेती, पाणी, आरोग्य, पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या रक्षणासाठी सतत लढा. सभा एकात्मता, निर्धार आणि लढाऊ भूमिकेचे प्रतीक ठरली. शेवटी सर्व उपस्थितांनी घोषणाबाजी करत ठाम भूमिका पुन्हा अधोरेखित केली.

**"एकच जिद्द – एमआयडीसी रद्द!**
**गाव आमचं – हक्क आमचा!**
**एक गाव – एक विचार – एक लढा!"**

# कबुतर प्रकरण ; जैन समाज आणि मराठी एकीकरण समिती आज आमनेसामने

**प्रतिनिधी**
**मुंबई**

दादरसह अन्यत्र असलेल्या कबुतरखान्यांवर आणि तेथील कबुतरांना दाणे खायला घालण्यावर महापालिकेने न्यायालयाच्या आदेशाने घातलेली बंदी उठविण्यासाठी जैन मुनी आणि त्यांच्यासह जैन समाज १३ ऑगस्ट रोजी आंदोलन करणार आहेत. तर, जैन समाजाच्या आंदोलनाच्या विरोधात आणि कबूतर खान्यावरील कारवाईच्या समर्थनार्थ मराठी एकीकरण समिती देखील १३ ऑगस्ट रोजी आंदोलन करणार आहे. त्यामुळे कबुतरांच्या प्रकरणावरून जैन समाज आणि मराठी एकीकरण समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते हे एकमेकांच्या समोर उभे ठाकणार असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार आहे.

या दोन्ही आंदोलनाबाबत महापालिका आणि पोलिस कोणती भूमिका घेणार आहेत ? याबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता समोर आलेली नाही. त्यामुळे १३ ऑगस्ट रोजी नेमके काय होणार याची उत्सुकता मुंबईतील नागरिकांना लागून राहिली आहे.

मुंबईतील कबुतरखान्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आल्याने न्यायालयाने मुंबई महापालिकेचे कान उपटल्याने महापालिका गेल्या काही दिवसांपासून कबुतर खान्याविरुद्ध कारवाई करण्यास सरसावली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकेने दादर, जीपीओ आदी ठिकाणी कबुतरांना दाणे टाकण्यास बंदी घातली होती. त्यामुळे कबुतरांची संख्या घटली. तर दुसरीकडे पालिकेने कबुतरांना दाणे टाकण्यास बंदी असतानाही त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला. तसेच, दादर येथील कबूतरखाना बंदिस्त केला. त्यामुळे जैन समाज, जैन मुनी यांनी तीव्र संताप व्यक्त केला. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सरसकट कबुतरखाने आणि कबुतरांना दाणे टाकणे बंद न करता कबुतरांना नियंत्रित पद्धतीने खाद्य देण्याची सूचना केली. तसेच न्यायालयाच्या आदेशाचे देखील पालन करण्यास सांगितले.

# सह्याद्री अतिथीगृहासमोर बसचा अपघात, वृद्ध महिलेचा मृत्यू



**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबईच्या मलबार हिल भागात सह्याद्री अतिथीगृहासमोर एका बेस्ट बसचा अपघात झाला. या अपघातात एका 75 वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार मृत महिलेचे नाव नीता शहा आहे. त्या रस्त्याच्या कडेला चालत होत्या. तेव्हा विजय वल्लभ चौकाहून कमला नेहरू पार्ककडे जाणाऱ्या १०५ क्रमांकाच्या मार्गावरील "डाउन" दिशेने जाणाऱ्या बसच्या चाकाखाली आल्या आणि अपघात झाला. "बसचालकाला मोठा आवाज ऐकू आला आणि त्याने तात्काळ गाडी थांबवली. खाली उतरून पाहिले तेव्हा एक पादचारी महिला अपघातात सापडल्याचे दिसले. घटनेच्या वेळी जवळच असलेल्या स्थानिक पोलिसांनी शहा यांना तातडीने जे.जे. रुग्णालयात हलवले. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. हा अपघात नेमका कसा झाला याचा पोलीस शोध घेत आहेत.

# अनधिकृत भाजी व्यापाऱ्यांची मुजोरी, वाहन चालकांसह प्रवासी हतबल

**प्रतिनिधी**
**मुंबई**

कांदिवली स्टेशनं पूर्व ते इतर ठिकाणी जाण्यासाठी आकुर्ली हा एकमेव मुख्य पण अरुंद मार्ग आहे.यां मार्गांवर मोठ्या प्रमाणात सातत्याने, वाहतूक असते. पहाटे 5 ते 7 यां वेळेत होलसेल भाजी विक्रेते, दुभाजकाच्या बाजूला,पथपदा सह रस्त्यावर मालाची विक्री करतात. माल घेऊन येणारे ट्रक, टेम्पो चक्क रस्त्यात उभे करतात. यामुळे कामाला जाण्याच्या घाईत असणारे प्रवासी, वाहन चालक यांना तारेवरची कसरत करतच मार्ग क्रमण करावे लागत आहे.

याकडे पोलीस, वाहतूक विभाग आणि पालिकेचे दुर्लक्ष झाल्याने, भाजी विक्रेत्यांची माजोरी वाढली आहे.कांदिवली पूर्वेला, दुर्तगती मार्गाकडे तसेच मालाड बोरिवलीकडे जाण्यासाठी आकुर्ली हा एकमेव मार्ग आहे. यां मार्गांवर भाजी विक्रेत्यांनी बस्तान मांडले आहे. यातील बहुतांशी भाजी विक्रेते होलसेल भाजी विक्रेते झाले आहेत. पहाटे भाजीपाला घेऊन येणारे ट्रक आणि पीक अप चक्क मार्गामध्ये, दुभाजका जवळ उभे करून भाजी पाला खाली करतात. सदर मार्गांवर



## भाजी विक्रेत्यांच्या मनमानीकडे पालिका-वाहतूक विभागाचे दुर्लक्ष, अपघाताची भीती

मोठ्या प्रमाणात विशेषतः रिक्षा, दुचाकी आणि बेस्ट बसेस यांची मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. मध्येच थांबविण्यात येणाऱ्या ट्रक मुळे, वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

पहाटे 5 ते 7 घाई च्या यावेळेत वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, होल सेल भाजी व्यावसायिक दुभाजकाच्या बाजूलाच, रस्त्यावर माल विक्री करतात. यामुळे ग्राहक, किरकोळ भाजी विक्रेते रस्त्यावर उभे राहून भाजीपाला खरेदी करतात.याचा नाहक त्रास वाहन चालकांसह प्रवाशांना करावा लागत आहे. पालिका, वाहतूक विभाग आणि पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केल्यानेच भाजी विक्रेत्यांची माजोरी वाढत चालली आहे. पालिका यांच्यावर कारवाई न करता उलट भाज्यांचा फेकलेला कचरा महापालिका उचलते.यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे अशी मागणी रिक्षा चालकांकडून केली जात आहे.

# कुलाब्यातील 1500 विद्यार्थ्यांना ऑनलाईन शाळा सक्ती संतप्त पालक काढणार पालिकेवर मोर्चा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

पालिका शाळेतील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाकडे अचानक वळवल्याच्या विरोधात सोमवारी कुलाबा महानगरपालिका शाळेतील पालक आणि विद्यार्थ्यांनी त्या शाळेसमोर निदर्शने केली. कुलाब्याचे माजी भाजप नगरसेवक मकरंद नार्वेकर यांच्या नेतृत्वातील निदर्शन करत जर बीएमसीने दोन दिवसांत या १,५०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून दिली नाही तर सर्व विद्यार्थी आपल्या पालकांसह पालिका मुख्यालयावर निषेध मोर्चा काढतील असा इशारा महापालिका प्रशासनाला दिला आहे.

गेल्या आठवड्यात, मकरंद नार्वेकर यांनी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाला पत्र लिहून हस्तक्षेप करण्याची मागणी केली. कुलाबा येथील एन ए सावंत मार्गावरील बीएमसीमार्फत चालवल्या जाणाऱ्या शाळेतील १,५०० विद्यार्थी ऑनलाइन शिक्षण घेत आहेत. नार्वेकर यांनी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनाही पत्र लिहून पर्यायी व्यवस्था करण्यासाठी तातडीने बैठक बोलावण्याची मागणी केली आहे.

***इमारती खरंच धोकादायक झाल्या आहेत का?***

*मकरंद नार्वेकर म्हणाले की, शाळेची इमारत जीर्ण झालेली नाही. दोन वर्षांपूर्वी तिची दुरुस्ती करण्यात आली होती. त्यामुळे शाळा बंद करून विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आणणे खपवून घेतले जाणार नाही. बीएमसीमधील वातानुकूलित कार्यालयांमध्ये बसलेल्या आयएएस अधिकाऱ्यांनी जागे होण्याची वेळ आली आहे. जर बीएमसीने पुढील दोन दिवसांत शाळेसाठी पर्यायी जागा उपलब्ध करून दिली नाही, तर शाळेतील सर्व विद्यार्थी आणि पालक बीएमसी मुख्यालयावर मोर्चा काढतील, असा इशाराही मकरंद नार्वेकर यांनी दिला आहे.*

# पालिकेच्या सार्वजनिक सुट्टयांमध्ये बदल करु नका - बाबा कदम

**मुंबई।** मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सार्वजनिक सुट्टयांबाबत दरवर्षी पालिकेच्या वतीने परिपत्रक निर्गमित केले जाते. यावर्षी माहे जानेवारी व माहे मार्चमध्ये दोन वेळा जर सार्वजनिक सुट्टयांचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले. सदर दोन्ही परिपत्रकात दहीहंडी व अनंत चतुर्दशी या अनुक्रमे १६ ऑगस्ट व ६ सप्टेंबर रोजी सुट्ट्या जाहिर करण्यात आल्या होत्या.पालिकेने या अगोदर कधीही जाहिर न केलेल्या नारळी पौर्णिमा (८ ऑगस्ट) व गौरी विर्सजन ( २ सप्टेंबर) या सुट्टया आयत्या वेळी म्हणजे ७ ऑगस्ट रोजी जाहिर केल्यामुळे कामगारांमध्ये नाराजी आहे. कारण दहीहंडी (गोपाळकाला) व अनंत चतुर्दशी या दोन दिवशी सार्वजनिक वाहतुक व्यवस्था विस्कळीत होते त्याचा फटका त्यांना बसु शकतो. तरी पालिकेने अगोदर जाहिर केलेल्या सुट्टयांमध्ये बदल करु नये, अशी मागणी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचेनेचे अध्यक्ष बाबा कदम यांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे.

**मध्य रेल्वे**
**ई-निविदा सूचना**

क्रमांक १. कामाचे नाव: कोचचे फर्निचर अंदाजे खर्च: ३,०४,३०,९०५.२५ निविदा फॉर्मची किंमत: रु. - इरठे: रु. ३,०२,२००/- पूर्ण कालावधी: १२ महिने अनुक्रमांक २. कामाचे नाव: कोचमधील सीट आणि बर्थचे स्ट्रिपिंग, री-कुशनिंग आणि फिटिंग अंदाजे किंमत: ६९,२५,५४१.८० निविदा अर्जाचे मूल्य : - इरठे : रु. १,३८,५००/- पूर्ण कालावधी: १२ महिने. दोन्ही ई-टेंडर अशा कंपन्यांकडून मागविण्यात येत आहेत, ज्या त्यांच्या वैयक्तिक क्षमतेनुसार किमान पात्रता निकष पूर्ण करतात. वरील ई-टेंडर सादर करण्याची वेळ आणि तारीख ०५.०९.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल. ई टेंडरची संपूर्ण माहिती रेल्वेच्या अधिकृत वेबसाइट https:// www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. ओपन ई टेंडर सूचना क्रमांक १] PR-C-LHB-FUR-25-26- 723 21 PR-C-LHB-SB-25-26-707 दिनांक: ०६/०८/२०२५

359 **मुख्य कारखाना प्रबंधक, परळ**

आपल्या जनावरांना रेल्वेलाईन पासून दूर ठेवा

**पब्लिक नोटीस**

कै. मितीन चिमणलाल शहा यांचे १५/११/२०२४ रोजी निधन झाले त्यांच्या हयातीत ते व त्यांची पत्नी श्रीमती आशा मितीन शाह, हे सदनिका क्र. ७, पहिला मजला, पाटण जैन मंडळ कॉ ऑप हौ सो लि, प्लॉट न. ए-२०/२१, रतन नगर, डी. एन. दुबे रोड, दहिसर पूर्व, मुंबई - ४०००६८ चे मालक होते आणि सोसायटीच्या ५ शेअर्सचे हक्क, प्रमाणपत्र क्रमांक ३५, १७१ ते १७५ पर्यंतचे शेअर्स, जारी, पाटण जैन मंडळ कॉ ऑप हौ सो लि., द्वारा चे सभासद होते.

रिलीझ डीड द्वारे दि.०१/०८/२०२५, उपनिबंधक मुंबई २३ यांच्या कार्यालयात नोंदणीकृत, नोंदणी क्र. १२६९२-२०२५ दिनांक ०१/०८/२०२५, कु. अमी मीतीन कुमार शाह (उर्फ कु. अमी मीतीन शाह) व कु. रेना मीतीन शाह (मुलगी) दोघी कै. मितीन चिमणलाल शाह यांचे वर्ग १ कायदेशीर वारस यांनी सदनिका मधील त्यांचे हक्क व शेअर्सचे हक्क त्यांच्या आई, श्रीमती आशा मितीन शाह यांना समभागांच्या हक्कांसह सोडले, आणि अशा प्रकारे श्रीमती आशा मितीन शाह यांनी १००% अविभाजित हक्क, शीर्षक तसेच सोसायटीच्या शेअर्सचे संपादन केले आहे.

श्रीमती आशा मितीन शाह यांचा दावा आहे की त्यांचे हक्क कोणत्याही स्वरूपाचे सर्व भार, शुल्क, दावे इत्यादींपासून मुक्त आहेत आणि सोसायटीच्या शेअर्ससह त्यांच्याकडे सदर सदनिकेचे स्पष्ट आणि विक्रीयोग्य मालकी हक्क आहे आणि त्यांनी मला नो क्लेम सर्टिफिकेट देण्याची विनंती केली आहे.

मी, ॲड. रजत के. सिंह याद्वारे या नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सदनिका धारण करणाऱ्या मृत सदस्याचे सदर हक्क, शीर्षक आणि हस्तांतरित करण्याबाबत वारस किंवा इतर दावेदार/आक्षेपकर्त्यांकडून दावे किंवा हरकती आमंत्रित करतो, अशा दस्तऐवजांच्या प्रती आणि मृत सदस्याचे अविभाजित हक्क, शीर्षक आणि हित हस्तांतरित करण्यासाठी त्यांच्या दाव्या/आक्षेपांच्या समर्थनार्थ इतर पुरावे. खाल खाली नमूद केलेल्या पत्त्यावर वरील विहित कालावधीत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, मी नो क्लेम प्रमाणपत्र जारी करीन आणि त्यानंतर कोणतेही दावे स्वीकारले जाणार नाहीत.

**ठिकाण : मुंबई**
**तारीखः १३/०८/२०२५.**

**सही/-**
**ॲड. रजत के. सिंग**
कार्यालय क्र. १३८, पहिला मजला, ओस्तवाल ऑर्नेट, इमारत क्र. २/अ. जैन मंदिराजवळ, जेसल पार्क, भाईंदर पूर्व, जि. ठाणे ४०११०५ (मो. नं. ८१६९८७५१९५)

# वेळेत वीज बिले भरल्याने गेल्या एक वर्षात 9 लाख 80 हजार ग्राहकांना 93 कोटींचा फायदा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महावितरण आपल्या ग्राहकांना विविध योजनांद्वारे उत्तम व सोयीस्कर सेवा देण्यासाठी नेहमी प्रयत्न करते. याचाच एक भाग म्हणून प्रॉम्प्ट पेमेंटची सुविधा देण्यात आली आहे. अनेक ग्राहक या योजनेचा लाभ घेत आहेत परंतु अजून काही ग्राहक असे आहेत ज्यांना या योजनेबाबत माहिती नाही. मुख्य अभियंता, भांडूप परिमंडल, संजय पाटील यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना त्यांच्या बिलांचा भरणा लवकर करण्याचे आवाहन केले आहे. यामध्ये, ग्राहकांना देयक दिनांकापासून सात दिवसात बिल भरल्यास वीज बिलाच्या १% रक्कम सूट म्हणून मिळते.

भांडूप परिमंडलातील एकूण ९ लाख ८० हजार वीज ग्राहकांनी प्रॉम्प्ट पेमेंट करण्यासाठी देण्यात येणाऱ्या १% सवलतीचा लाभ घेऊन मागील एका वर्षात एकत्रितपणे तब्बल ९३ कोटी १९ लाख रुपयांची बचत केली आहे. बिलांवर त्वरित पेमेंट करण्याची अंतिम मुदत स्पष्टपणे दर्शविली असते व ग्राहक महावितरणचे अधिकृत मोबाइल ॲप, वेबसाइट, क्रेडिट व डेबिट कार्ड, यूपीआय, भीम, इंटरनेट बँकिंग व मोबाइल वॉलेटसह अनेक पर्यायांचा वापर करून पेमेंट करू शकतात. मुदतीत देयक न भरणाऱ्या ग्राहकांना १.२५% विलंब शुल्क आकारले जाते. भांडुप परिमंडलात देय तारखेपर्यंत बिल न भरल्यामुळे मागील एका वर्षात २ लाख ७३ हजार ग्राहकांनी २० कोटी ४८ लाख रुपये विलंभ शुल्क भरावा लागला आहे. याव्यतिरिक्त, या डिजिटल पेमेंट पद्धती वापरणाऱ्या ग्राहकांना ०.२५% ची अतिरिक्त सूट (मर्यादा रु.५००) मिळू शकते. शिवाय, कागदाचा वापर कमी करण्यासाठी महावितरणचा "गो-ग्रीन" उपक्रमात इलेक्ट्रॉनिक पद्धतीने बिल स्वीकारणाऱ्या ग्राहकांना रु. १० ची सूट देण्यात येते.

"ग्राहकांना वेळेवर बिल भरून पैसे वाचवण्याची संधी आहे. महावितरण ऑनलाइन पेमेंटसाठी व गो-ग्रीन उपक्रमाद्वारे अतिरिक्त सवलती देखील देत आहे. तरी, सर्व ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेऊन पर्यावरणपूरक पद्धतींना प्रोत्साहन द्यावे", असे आवाहन भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता, संजय पाटील यांनी वीज ग्राहकांना केले आहे".

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**क्र. एसीआरसी/१४४६/जन/एईएम दि. ११.०८.२०२५**

**लघू ई-निविदा सूचना**

**बृहन्मुंबई महानगरपालिका चे आयुक्त खाली नमूद कामासाठी ई-निविदा मागवित आहेत.**

| अनु. क्र | कामाचे नाव | इरठे (रु. मध्ये) | निविदा छाननी शुल्क (रु. मध्ये) | कामाचा पूर्तता कालावधी | बोली सुरु होण्याचा दिनांक आणि वेळ | ऑन लाईन बोली सादरीकरणासाठी देय दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बोली क्र:- २०२५_ एमसीजीएम_१२०९३५७_१ आर/ सेन्ट्रल प्रभागामधील बोरीवली (प) मधील बीट क्र. १६ मधील बाभई स्मशानभूमी येथे हाऊस कीपिंगकरीता मजुरांचा पुरवठा | रु. १७,०६६/- | रु. १,४५२/- + जीएसटी | १८० दिवस | १३.०८.२०२५ रोजी. ११.०० वा. पासून | १९.०८.२०२५ रोजी १६.०० वा. पर्यंत |

वरील विषयांकित मजकुराच्या संदर्भात तपशील महाराष्ट्र सरकार (महाटेंडर) च्या ई-प्रापण यंत्रणेवर http://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे. तसेच वरील विषयांकित मजकुराच्या संदर्भात तपशील बृमनपा पोर्टल वर देखील उपलब्ध आहे. (http://portal.mcgm.gov.in)

पीआरओ/१२५९/जाही/२०२५-२६

**सही/-**
**(श्रीमती संध्या नांदेडकर)**
**सहाय्यक अभियंता, आर/ सेन्ट्रल**

**जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.**

जीवनाला सामोरे जाताना विद्यार्थ्यांच्या ठायी आत्मविश्वास निर्माण करणं, हेच उत्तम शिक्षकांचं कर्तव्य आहे.




- सुधा मूर्ती

वृत्तमानस
मुंबई, बुधवार, १३ ऑगस्ट २०२५

# कुपोषणाचे चक्र कधी भेदणार?

आदिवासी भागांतील बालकांमधील कुपोषण आणि मातामृत्यू दर कमी करण्यासाठी गेली अनेक वर्षे व्यापक प्रयत्न सुरू असले तरी त्याला म्हणावे तसे यश येताना दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. बालमृत्यूंचे एक महत्त्वाचे कारण कुपोषण किंवा बाळाची उपासमार असते. बाल-कुपोषणाने बाळाची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळे लवकर आजार होतात. पण ते लवकर बरे होत नाहीत. आजारांमुळे कुपोषण वाढते. असे मूल दगावण्याची शक्यता असते. याचे मूळ कारण कुपोषण व तात्कालिक कारण असते. देशभरात अर्भक, बालक आणि मातांचे मृत्यू रोखण्यासाठीचे प्रयत्न फोल ठरले आहेत. गंभीर बाब म्हणजे जगातील बालमृत्यूंपैकी एक चतुर्थांश बालमृत्यू आपल्या देशात होत असून यात अठ्ठावीस दिवसांखालील बालकांचे मृत्यूचे प्रमाण सर्वाधिक आहे. नवजात बालकांचा मृत्यूदरही धोक्याच्या पातळीवर असून तो २२.४ टक्के आहे. महाराष्ट्रापुरता विचार करायचा तर राज्यात गेल्या पाच वर्षांत बालमृत्यूच्या प्रमाणात किंचितशी घट झाली आहे. २०१४ मध्ये २३ वरून ते २०१६ मध्ये २१ वर आले. एकट्या मुंबईतच २०१६-१७ या वर्षात एक हजार ४१४ बालमृत्यू झाले. ते आधीच्या तुलनेत कमी असले तरी यावर समाधान मानण्यासारखी स्थिती नाही. कमी पोषण, उंचीच्या तुलनेत कमी वजन, पाच वर्षांखालील मुलांचे उंचीच्या तुलनेत कमी वजन, मुलांची वाढ खुंटणे, कुपोषण, बालमृत्यू दर, पाच वर्षांखालील मुलांचा मृत्यू दर हे घटक यात विचारात घेतले जातात. जगभरातील स्थिती मध्यम असल्याचा उल्लेख जागतिक कुपोषण निर्देशांकात करण्यात आला असून जगभरातील ६० कोटींहून अधिक लोक कुपोषित असल्याचा इशारा देण्यात आला आहे. देशातील भुकेच्या स्थितीवरून देशांना ० ते १०० असे गुण दिले जातात. त्यानुसार त्यांची क्रमवारी ठरवली जाते. यामध्ये ० गुण हे सर्वोत्तम समजले जातात, याचा अर्थ एकप्रकारे त्या देशात भुकेची स्थिती काळजी करण्यासारखी नाही असाच होतो. भारताला ५० पैकी २७.२ गुण देण्यात आले असून परिस्थिती गंभीर असल्याचं सांगण्यात आलं आहे. ९.९ पेक्षा कमी गुण असल्यास परिस्थिती गंभीर नाही. १० ते १९.९ मध्ये गुण असल्यास परिस्थिती मध्यम आहे. २० ते ३४.९ गुण असल्यास भुकेची परिस्थिती गंभीर आहे. ३५ ते ३९.९ गुण म्हणजे धोक्याची घंटा तर ५० हून अधिक गुण म्हणजे धोका खूप वाढला असून परिस्थिती भयावह आहे असा अर्थ होतो. सध्यातरी भारताची कामगिरी तुलनेत सुधारली आहे. एका माहितीनुसार भारतातील २२ राज्यांपैकी १३ राज्यांत बालकांची वाढ खुंटण्याचं प्रमाण वाढले आहे. देशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात १५.३ टक्के कुपोषणाचं प्रमाण आहे. पाच वर्षांखालील १७.३ टक्के बालकांचं वजन त्यांच्या उंचीच्या मानाने कमी आहे. वयाच्या मानाने कमी उंची असणारी, म्हणजेच वाढ खुरटलेली अशी ३४.७टक्के बालकं आहेत. भारतात जन्माला येणाऱ्या दर शंभर मुलांपैकी जवळपास वीस मुलांच्या मेंदूची आणि शरीराची वाढ कुपोषणामुळे कायमची खुंटते. हे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. ही भारताची पुढची पिढी आहे. अंगणवाडी, घरच्या घरी नवजात बालकांची काळजी, राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम, निमियामुक्त भारत, जननी सुरक्षा योजना, मानव विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, नवसंजीवनी अशा अनेक योजना आहेत. त्या बळकट करायला हव्यात. पण भूक किंवा कुपोषण दूर करायला निव्वळ या योजना कशा पुरणार? पोषण आहारासाठी लोकांना अन्नधान्य, भाजीपाला घेणं परवडणं, त्यांची क्रयशक्ती वाढणं म्हणजे त्यांच्या हाती पैसा खेळणं, हे सर्वात महत्त्वाचे ठरले आहे. तांदळाची सर्वांत मोठी निर्यात करणारा आपला देश. दूध व इतर अनेक खाद्यान्नांच्या उत्पादनात भारत पुढे आहे. तरी प्रत्येक भारतीयाला पोषण आहार, दोन वेळा पोटभर जेवण आजही मिळत नाही. धान्योत्पादन आणि साठा असूनही, धान्याच्या किंमती चढ्या राहाणं, हेही उपासमारीचे एक कारण. पालघर जिल्हा निर्मितीपासून बालमृत्यू आणि माता मृत्यूचे प्रमाण सातत्याने वाढत असून गेल्या अकरा वर्षात ४ हजार किमान २५ बालमृत्यू झाले असून १४९ मातांचा मृत्यू झाला आहे. या मृत्यूला कुपोषणासह विविध कारणे जबाबदार आहेत. गेल्या ११ वर्षात हे बालमृत्यू आणि मातामृत्यू झाले असले तरी गेल्या तीन वर्षात पालघर जिल्ह्यातील मृत्यूंचा आलेख कमी होत चालला आहे ही समाधानाची बाब मानावी. जिल्ह्याच्या जव्हार, मोखाडा, डहाणू तलासरी व वाडा अशा ग्रामीण भागांमध्ये कुपोषणाबरोबरीने बालमृत्यूचे प्रमाण लक्षणीय आहे. ग्रामीण भागांमध्ये बालविवाहासारख्या अनिष्ट रूढी परंपरा अजूनही कमी झालेल्या नाहीत. पालघर जिल्ह्यात गेल्या पाच वर्षात पाचशेहून अधिक बालविवाह झाल्याचे अलीकडे एका सर्वेक्षण अहवालातून समोर आले होते. कुपोषण, कमी दिवसात जन्मलेले बाळ, कमी वजनाचे बाळ, इतर आजार, अपघात, श्वासोच्छवास कोंडणे अशा विविध कारणांनी ते ६ वर्षांच्या बालकांचा बालमृत्यू होत असल्याचे तज्ज्ञांमार्फत सांगण्यात येते. तर रक्तक्षय, मुदत पूर्व प्रसूती, शारीरिक कमजोरी, हृदयविकार अशा कारणांमुळे माता मृत्यू होत आहेत. पालघर जिल्ह्यात मुदतपूर्व प्रसूतीमुळे बालकांची मृत्यू झाल्याची संख्या जास्त असली तरी कमी वजनाचे बाळ जन्मल्यामुळे मृत्यूचे प्रमाण आहे. पालघर जिल्ह्यामधील माता मृत्यूचे प्रमाण चिंताजनक असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरून दिसून येत आहे. गेल्या तीन वर्षांमध्ये आरोग्य विभागासह महिला बाल विकास विभाग ग्रामपंचायत तसेच जिल्हा परिषदेतील लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयाने जिल्ह्यात बालमृत्यू कमी करण्यासाठी राबविण्यात आलेले कुपोषण निर्मूलन प्रभावीपणे राबवले जात असल्यामुळे राज्याच्या तुलनेत गेल्या तीन वर्षात पालघर जिल्ह्यातील बालमृत्यूमध्ये घट झालेली आहे. हा आलेख कायम राहणे आवश्यक आहे. चिंतेची बाब म्हणजे किशोरवयीन मातांच्या मुलांमधील कुपोषणाचा धोका किती गंभीर आहे हे भारतातील पौगंडावस्थेतील गर्भधारणा आणि मुलांमधील कमी पोषण यांच्यातील संबंधांवर अभ्यासात स्पष्टपणे दिसून येते. प्रौढ मातांच्या तुलनेत पौगंडावस्थेतील मातांमध्ये कमी वजनाच्या मुलांचा धोका १० टक्क्यांनी जास्त आहे. आजही सुमारे सुमारे ४० टक्के किशोरवयीन मुलींना अशक्तपणाचा त्रास होतो. एक चतुर्थांश किशोरवयीन मुली या शालेय सेवांपासून वंचित आहेत. ज्यात माध्यान्ह भोजन, द्विवार्षिक आरोग्य तपासणी, जंत तपासणी, साप्ताहिक लोह आणि फोलिक ॲसिड पूरक आहार या सेवांचा समावेश आहे. पौगंडावस्थेतील तरुण आणि प्रौढांचे जीवन समजून घेताना पोषण आहार हा अतिशय महत्त्वाचा घटक असल्याचे अभ्यासाच्या निष्कर्षातून समोर आले आहे. पौगंडावस्थेतील मुले आणि तरुण मुली कुपोषणाच्या चक्रात कसे अडकले जातात हे देशभरातील विविध केस स्टडिजवरून लक्षात येते. लवकर विवाह, गरीब सामाजिक-आर्थिक परिस्थिती, योग्य पोषणाचा अभाव आणि शिक्षणाचा अभाव यासह अनेक घटकांचा यात समावेश आहे. पिढ्यान्पिढ्या चालत आलेले कुपोषणाचे चक्र भेदण्यासाठी पौष्टिक आहारात गुंतवणूक होणे किती महत्त्वाचे हे यातून स्पष्ट होते. कारण याचा परिणाम पुढील अनेक पिढ्यांवर होत असतो. लवकर होणारे विवाह रोखणे, पौगंडावस्थेतील गर्भधारणा टाळणे आणि त्रियांची पौष्टिक स्थिती सुधारणे या मूलभूत गोष्टींचा अवलंब केल्यास कुपोषणाच्या चक्राला ब्रेक लावण्यात बऱ्याच अंशी मदत होऊ शकते.

# 'गोपाळकाला' उत्सवाचे बदलते स्वरूप !





श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोऱ्या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे श्रीकृष्ण जयंतीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली. कालपरत्वे या प्रथेचे व्यावसायिकरण झाले आणि ठिकठिकाणी लाखांची बक्षिसे मिळवून देणाऱ्या हंड्या बांधल्या जाऊ लागल्या. आता नवरात्रीप्रमाणे दहिहंडी उत्सवही राजकारणी आणि धनदांडग्यांची मक्तेदारी झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या हंड्या इच्छुक उमेदवारांसाठी प्रचाराचे मोठे साधन ठरणार आहेत. त्यामुळे दहीहंडी पथकाकांडून यंदा भरघोस कमाई केली जाणार हे निश्चित आहे. दहीहंडीच्या व्यासपीठावरून राजकीय फटाके फुटण्याची शक्यताही यंदा नाकारता येत नाही. जो अधिक रकमेची बक्षिसे लावेल त्याच्या दहीहंडीला मोठ्या प्रमाणात गर्दी तर दिसतेच शिवाय वृत्तवाहिन्या, लोकल केबल नेटवर्कवाले अशा ठिकाणी पहाटेपासून दबा धरून बसलेली पाहायला मिळतात. लोकांनी अधिक गर्दी करावी यासाठी याठिकाणी सेलिब्रिटीजनाही अतिथी म्हणून बोलावले जाते. त्यांच्याकडून नृत्य करवून घेतले जाते, चित्रपटातील संवाद म्हणण्यास सांगितले जाते. काही तरुण मंडळी तर खास या सेलिब्रिटी मंडळींना पाहण्यासाठी गर्दी करतात.

गोविंदा पथक येतात, मनोरे रचतात, मोठे साहस करून अगदी वरच्या थराला पोहोचलेली किशोरवयीन मुले जमलेल्या जमावाला अभिवादन करतात; मात्र खास सेलिब्रिटींना पाहण्यासाठी आलेल्या मंडळींचे या गोविंदा पथकांकडे लक्षही नसते. वृत्तवाहिन्या, केबल नेटवर्क यांचे कॅमेरेसुद्धा केवळ सेलिब्रिटींभोवतीच घुटमळत असतात. दहिहंडीला साहसी खेळाचा दर्जा देण्यासाठी राज्य सरकारच्या पुढाकारातून मागील काही वर्षांपासून मुंबईत प्रो कबड्डीच्या धरतीवर प्रो दहीहंडीचे आयोजन केले जात आहे. अर्थात याठिकाणी दहीहंडीच नसल्याने दहीहंडीच्या नावावर ती मानवी मनोऱ्यांची स्पर्धाच असले असेच म्हणावे लागेल. दहीहंडी उत्सवाच्या दिवशीही पुन्हा हेच चित्र पाहायला मिळते. ज्या ठिकाणी दहीहंडीचा इव्हेन्ट बनवला जातो त्या ठिकाणी दहीहंडी केवळ नावाला उभी केलेली असते. अधिकाधिक थर लावा आणि तेव्हढ्या थरांसाठी नियोजित केलेली रक्कम घेऊन जा हा एकच कार्यक्रम याठिकाणी राबवला जातो. त्यामुळे याला उत्सव म्हणावे कि साहसी खेळाची प्रात्यक्षिके हाही एक प्रश्नच आहे. राज्यसरकारने गोविंदा पथकांना लाखो रुपयांचे विमाकवच देऊन या मनोऱ्याच्या स्पर्धेला जणू प्रोत्साहनच देत असते. आज सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहेत त्यामुळे दहीहंडीही यातून सुटलेली नाही. मुंबईत महिला गोविंदा पथकांची संख्याही वर्षागणिक वाढू लागली आहे. ज्या ठिकाणी महिला गोविंदा पथक हंडी फोडण्यास येतात अशा ठिकाणी बघ्यांची गर्दी जरा जास्तच झालेली पाहायला मिळते. यामध्ये आंबट शौकीनही असतात. श्रीकृष्णाने बालगोपाळांसह हंड्या फोडून लोणी खाल्ल्याचे सर्वांनाच ज्ञात आहे; मात्र गोपिकांनी त्याकाळी असे काही केलेले नाही, त्यामुळे दहीहंडी उत्सवाकडे धार्मिक उत्सव म्हणून पाहायचे असेल, तर किमान महिलांच्या हंडीची तरी या उत्सवामध्ये गणना करू नका. श्रीकृष्णाचे सवंगडी विविध वर्णातील तर होतेच शिवाय त्यातील अनेक जण खूपच गरीब होते. आपल्या सवंगड्यासह आपलीही शिदोरी एकत्र करून सारे भेद नष्ट करून एकत्र येण्याचा मोलाचा संदेश श्रीकृष्णाने गोपाळकाल्याच्या माध्यमातून दिला आहे. आज हिंदू धर्मामध्ये जातीपातीच्या नावाखाली, राजकीय पक्षभेदामुळे आणि वैचारिक भेदांमुळे विविध गट निर्माण झाले आहेत.

आज जाहिराती, सिनेमा, वेब सीरिजच्या माध्यमांतून केले जाणारे देव-देवतांचे, महापुरुषांचे, इतिहासाचे विकृतीकरण याचे आपल्याला काहीच वाटत नाही. कोणीही उठते आणि हिंदूंच्या धार्मिक प्रथा परंपरांना अंधश्रद्धा म्हणून हिणवते. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आपणच आपल्या महान संस्कृतीला विसरून परकीय संस्कृतीला जवळ करू लागलो आहोत. परिणामी आपलीच अपरिमित हानी होत आहे. भगवान श्रीकृष्णाच्या शिकवणीनुसार यंदा आपापसातील सारे मतभेद विसरून राष्ट्राच्या आणि धर्माच्या पुनरुत्थानासाठी एकत्र येण्याचा संकल्प करूया आणि खऱ्या अर्थाने गोपाळकाला साजरा करूया.

- जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

# ध्वजसंहितेचे पालन करून घरोघरी तिरंगा फडकवावा!



यावर्षी आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत. अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. हजारो, लाखो क्रांतिकरांकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे. या हजारो, लाखो ज्ञात- अज्ञात क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीनेही देशकार्यासाठी पुढे यावे या उद्देशाने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सरकारने केले आहे त्याचाच एक भाग म्हणून आजपासून म्हणजे १३ ऑगस्ट पासून १५ ऑगस्ट पर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत भारताच्या ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून भारताच्या नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आली. या दिवशी देशातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज अभिमानाने फडकवावा असे आव्हान सरकारतर्फे करण्यात आले आहे. घरोघरी तिरंगा या उपक्रमाची जनजागृती व्हावी यासाठी देशभर विविध कार्यक्रम चालू आहेत. तिरंगा हा आपला राष्ट्रध्वज आहे. देशाचे मानचिन्ह म्हणजे तिरंगा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या सारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंगा अभिमानाने फडकावून तिरंग्याला मानवंदना देणे हे आपले कर्तव्यच आहे. १३, १४ आणि १५ या तीन दिवशी सर्व नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा आणि तिरंग्याला मानवंदना द्यावी. घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. ध्वज फडकवताना ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी.

पूर्वी ध्वज तयार करण्यासाठी हाताने विणलेले किंवा कातलेले कापड वापरले जाई आता यंत्रावर तयार केलेले कापड देखील तयार करण्यास परवानगी देण्यात आली आहे मात्र हा कापडी तिरंगा ध्वज, चुरगळलेला, फाटलेला, किंवा खराब झालेला नसावा. ध्वज फडकवताना केशरी रंग वरच असावा कोणत्याही परिस्थितीत तो तळाशी राहणार नाही याची काळजी घ्यावी. तिरंगा ध्वज फडकवताना तिरंग्यापेक्षा जास्त उंचीवर किंवा शेजारी दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. एकाच ध्वजारोहणाच्या खांबावरती तिरंग्या सोबत दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. तिरंगा उंचावरच फडकावा. तिरंगा फडकवल्यानंतर तो खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी. ध्वज उतरवताना देखील ध्वज संहितेचा मान राखावा. सन्मानपूर्वक ध्वज उतरावा. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी कारण तिरंगा हे आपले राष्ट्रीय प्रतीक आहे तिरंग्याला अपमान म्हणजे देशाचा अपमान. १५ ऑगस्ट नंतर तिरंगा ध्वज व्यवस्थित घडी घालून सन्मानपूर्वक ठेवावा. ध्वज संहितेच्या नियमांचे पालन करून प्रत्येकाने आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा व घरोघरी तिरंगा हा उपक्रम यशस्वी करावा. जयहिंद ! जयभारत!!

- श्याम ठाणेदार
पुणे

## पत्र मानस

### थराराचा जीवघेणा थर

दहिसर पूर्वेकडील केतकीपाडा परिसरातील नवतरुण मित्र मंडळाचा अल्पवयीन गोविंदा महेश जाधव (वय ११ वर्षे) याचा सरावावेळी सहाव्या थरावरून पडून मृत्यू झाल्याची बातमी चिंताजनक आहे. हा अपघात केवळ एका कुटुंबासाठी अपरिमित दु:खाचा काळा दिवस नसून, दहीहंडी सणाच्या बदलत्या स्वरूपावर गंभीर प्रश्नचिन्ह उभा करणारा आहे. दहीहंडीला दिलेला साहसी खेळाचा दर्जा, आयोजकांतर्फे लाखो रुपयांच्या बक्षिसांची आमिषे, आणि प्रतिष्ठेच्या स्पर्धेचा हव्यास – या सर्वांनी सणाचे स्वरूप पूर्णपणे बदलून टाकले आहे. त्यात भर म्हणजे दहीहंडीसाठी आखून दिलेल्या नियमावलीचे पालन न करणे, सुरक्षा साधनांचा अभाव, आणि क्षमतेपेक्षा जास्त थर लावण्याची धडपड. या घटनेवरून पुन्हा एकदा अधोरेखित झाले की शेवटच्या थरावर अल्पवयीन मुलांचा सहभाग ही गंभीर चिंतेची बाब आहे. सरावावेळीच जर अशी दुर्घटना घडत असेल तर प्रत्यक्ष सणाच्या दिवशी काय घडेल? यापूर्वीही सणाच्या दिवशी असेच अपघात झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. या घटनेवरून बोध घेऊन योग्य ती काळजी घेऊन यंदा तरी दहीहंडी सण अपघातमुक्त ठरावा.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी**

### लहान मुलांना वरच्या थरावर चढवू नका

दहिसरच्या केतकीपाडा येथे दहीहंडीचा सराव सुरू असताना सहाव्या थरावरून कोसळून एका ११ वर्षीय बालगोविंदाचा दुर्दैवी अंत झाल्याची घटना घडली.चिमुरड्या गोविंदांचा जीव धोक्यात घालणाऱ्या सराव पद्धतीतील बेजबाबदारपणा वर टीका होत आहे. सराव करताना मंडळाने सुरक्षा उपाययोजना राबवणे आवश्यक होते.सण साजरे करा पण सुरक्षेचे नियम पाळा.कोणाचाही जीव धोक्यात घालून सण साजरे करू नको. दहीहंडीच्या बक्षिसांसाठी कोणच्याही जीवाशी खेळू नका. आयोजकांनीही सुरक्षेच्या नियमाप्रमाणे दहीहंडी सण साजरा करावा.लहान मुलांना वरच्या थरावर चढवणे सुरक्षित नाही. आगामी पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लाखो रुपयांच्या बक्षिसांची खैरात करून वर्चस्वाची हंडी फोडण्यासाठी राजकीय पक्षही मैदानात उतरले आहेत.पण हेच राजकीय पक्ष अपघातानंतर जबाबदारी स्विकारत नाहीत.तेव्हा गोविंदा पथकांनी सुरक्षेची उपाययोजना करुन आपल्या गोविंदांच्या सुरक्षिततेची काळजी घेऊनच हंड्या फोडाव्यात. या घटनेमुळे गोविंदांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. गोविंद पथकांचा निष्काळजीपणा गोविंदांच्या मृत्युस कारणीभूत ठरत आहे.गोविंदा पथकांनी सर्व गोविंदांचा विमा उतरावा.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### निवडणूक आयोगावर मोर्चा काढला म्हणून परिस्थिती बदलू शकेल का ?

देशात काँग्रेस गेली वीस वर्षे सत्तेवर येण्यासाठी धडपड करत आहे पण त्यांना जनादेश मिळत नाही तर दुसरीकडे एनडीऐ म्हणजेच पीएम मोदी सरकार त्यांचा तिसरा टर्म पूर्ण करत आहे. माजी पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांच्या परिवारातील तीन तीन खासदार आज संसदेत निवडून आले असले तरी दुर्दैवाने पंतप्रधान पद पुन्हा एकदा गांधी कुटुंबाला मिळण्याची शक्यता दूरवर दिसत नाही. निवडणूक आयोगाच्या कामातील त्रुटीमुळे विशेषतः मतदार यादीतील त्रुटीमुळे काँग्रेसला सत्ता मिळू शकली नाही असा दावा विरोधकांचा आहे. निवडणूक आयोग फक्त निवडणूक प्रकिया राबवते पण मतदारराजाच शेवटी ठरवत असतो की कोणाला निवडून द्यायचे. तेव्हा देशावर सलग पन्नास वर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेस आणि इंडिया आघाडीने निवडणूक आयोग कार्यालयावर अलिकडेच मोर्चा काढून नेमके काय मिळवले आहे हे जनतेला अजूनही समजायला मार्ग नाही,असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### दहीहंडी पथकात लहान मुलांचा समावेश धोकादायक

दहीहंडी गोपाल काला उत्सव अगदी तोंडावर आला आहे. त्यामुळे गोविंदा पथकांचा सराव जोरदार सुरू आहे. मुंबईतील व्यायाम शाळेतील पथके आणि मंडळे उत्साहाने भाग घेत आहेत. सरावाच्या पथकातील दहीसरचा ११ वर्षीय मुलगा महेश जाधव जखमी झाला. उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. खरं तर आनंदाच्या काळात शोककळा पसरते दु:खद घटना आहे. मुलांना वरच्या अगदी शेवटच्या थरावर पाठवले जाते.यात त्यांचा तोल जाऊन दुखापत होऊ शकते. सरकारने गोविंदांचा दिड लाखांपर्यंतचा सुरक्षा विमा काढला आहे. परंतु सराव करणाऱ्यांसाठी नाही. दहीहंडी हा उत्सवात लहान मुलांचा समावेश करणे घातक आहे. दहीहंडी हा उत्सव आनंददायी खेळ आहे. परंतु त्याला पैशाचे आमिष दाखवून व्यापारी स्वरूप दिले जात आहे. जीवावर बेतणारा थर मृत्यूला सामोरे जाणारा असता कामा नये. सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर येणे साहजिकच आहे. लहान मुलांचा अकाली मृत्यू होणे निश्चितच चिंताजनक आहे.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर, अंधेरी**

## शाळकरी मुलांच्या मार्गांवर जीवघेणे खोल खड्डे, अपघाताचा धोका

**भाईंदर :** भाईंदरमध्ये शाळकरी मुलं प्रवास करत असलेल्या मार्गांवर जीवघेणे खोल खड्डे असल्याची बाब समोर आली आहे. यामुळे कोणत्याही क्षणी दुर्घटना घडण्याची भीती निर्माण झाली आहे. पावसाच्या हजेरीनंतर मिरा भाईंदर शहरातील रस्त्यांना खड्डे पडल्याची बाब समोर आली होती. याबाबत राजकीय पक्षांनी तसेच नागरिकांनी आक्रोश व्यक्त केल्यानंतर प्रशासनाने मुख्य मार्गांवरील खड्डे भरण्याचे काम बऱ्यापैकी पूर्ण केले आहे. मात्र अद्यापही शहरातील अंतर्गत रस्त्यांवरील खड्ड्यांची समस्या कायम आहे. यामुळे पायी प्रवास करणे, वाहन चालवणे आणि इतर कामानिमित्त बाहेर पडणे नागरिकांना कठीण झाले आहे. काशिनगर भागात रस्त्यावर चक्क दोन फुटांपर्यंत खोल खड्डे पडल्याचे समोर आले आहे. यामुळे रस्त्याखालील पाणी आणि दगड थेट दिसून येत आहेत. या भागात अनेक गृहसंकुले असून लहान मुलं याच रस्त्याच्या कडेला बऱ्याचदा खेळत असतात. तसेच शाळेतून प्रवास करणाऱ्या मुलांचाही प्रवास याच मार्गांवरून होतो. परिणामी, कोणत्याही क्षणी अशा खड्ड्यात पडून मुलं जखमी होण्याची दाट शक्यता आहे.



**म ह त्त्वा चे**

### गायमुख घाटात दुरुस्तीसाठी अवजड वाहतुक बंदी

**ठाणे :** घोडबंदर येथील गायमुख घाट रस्त्याच्या दुरुस्तीचे काम मिरा भाईंदर महपालिकेकडून केले जात आहे. या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम अद्याप शिल्लक असून ही कामे १५ ते १८ ऑगस्ट या कालावधीत केली जाणार आहे. त्यामुळे अवजड वाहनांना पुन्हा भिवंडी-काल्हेर, मुंबई नाशिक महामार्ग, चिंचोटी पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्यात आला. त्याचा परिणाम या मार्गांवर होणार आहे. मागील आठवड्यात सुट्ट्यांच्या दिवसांत हजारो वाहने रस्त्यावर आली होती. आता पुन्हा एकदा गायमुख घाट रस्त्याचे काम केले जाणार असल्याने मोठ्या कोंडीचा सामना नागरिकांना सहन करावा लागण्याची शक्यता आहे. ठाणे, वसई, विरार, मिरा भाईंदर, गुजरात, बोरीवली, दहिसर येथे वाहतुक करणाऱ्या वाहन चालक, नोकरदारांसाठी घोडबंदर मार्ग महत्त्वाचा आहे. तसेच गुजरात व वसई परिसरातून उरणमधील जेएनपीए बंदर किंवा भिवंडीच्या दिशेने वाहतुक करणारी अवजड वाहतूक प्रामुख्याने याच मार्गावरून वाहतुक करतात. परंतु पावसाळ्यात गायमुख घाटात मोठ्याप्रमाणात खड्डे पडले.

### पावसाच्या दडीमुळे ओसंडून वाहणारे धरणाचे पाणी थांबले

**उरण :** गेल्या पंधरा दिवसापासून पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे रानसई धरण वाहने बंद झाले आहे. याचा परिणाम धरणातील भविष्यातील पाणी पुरवठ्यावर होणार आहे. त्यामुळे उरणकरांच्या पाणी पुरवठ्यावर याचा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावर्षी मे महिन्यातील अवकाळी पावसामुळे जून महिन्याच रानसई भरून वाहू लागले आहे. रानसई धरणाची साठवणूक क्षमता घेटल्याने उरणच्या नागरिकांना नोव्हेंबर महिन्या पासूनच पाणी कपातीचा सामना करावा लागत आहे. ही समस्या अधिक गंभीर होऊ लागली आहे. मात्र पावसाळ्यात चार महिने होणाऱ्या पावसामुळे धरणात पाणी पातळी कायम राहण्यास मदत होते. मात्र गेल्या पंधरा दिवसापासून पावसाने दडी मारल्याने धरणातील ओसंडून वाहणारे पाणी बंद झाले आहे. एकीकडे धरण भरल्याने जादा वाहणाऱ्या रानसई मधील पाणी कधी अडणार असा प्रश्न आता उभा राहिला आहे.

### उग्र वासाचा केमिकल टँकर जप्त

**नवी मुंबई :**महानगरपालिकेच्या दिघा विभागामध्ये ०७ ऑगस्टपासून ग्रीन वर्ल्ड सोसायटी आणि रामनगर परिसरात केमिकलचा उग्र वास येत असल्याने परिसरातील नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या भागात अथवा नाल्यामध्ये अज्ञात व्यक्ती उग्र रसायन सोडत असल्याचा संशय असल्याने पोलीस यंत्रणा, ऐरोली अग्निशमन दल, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरण विभागाला कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर रसायन कोठे सोडण्यात येत आहे हे शोधण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. यावेळी नवी मुंबई महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत ग्रीन वर्ल्ड सोसायटी समोरील नाल्यातील पाण्याचे सॅम्पल तपासणीसाठी नेण्यात आले होते. त्यानंतरही दिघा विभागातील अधिकारी/कर्मचारी तसेच पर्यावरण विभागातील अधिकारी/कर्मचारी रात्रीच्या वेळी गस्त घालत होते.

# गरज असताना जवळ घेणं आणि काम झाल्यावर दूर सारणं ही तटकरेंची जुनी पद्धत

## राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची टीका

प्रतिनिधी
■ अलिबाग

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून निर्माण झालेला वाद अधिक तीव्र होत चालला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज (12 ऑगस्ट) खासदार आणि माजी मंत्री सुनील तटकरे यांच्यावर थेट निशाणा साधत टीका केली. चव्हाण यांनी म्हटलं की, महायुती सरकारमधील मंत्री भरत गोगावले यांच्यावर झालेला अन्याय खपवून घेण्यासारखा नाही. तसंच, तटकरे यांनी त्यांच्या विरोधात भूमिका घेतल्याचं सांगताना, त्यांनी यापूर्वीही अनेक नेत्यांचा वापर करून



त्यांना नंतर सोडून दिल्याचा आरोप चव्हाण यांनी केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) रायगड जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पालकमंत्री पदावरील वादावर पत्रकार परिषद घेऊन खासदार सुनील तटकरे यांच्यावर जोरदार टीका केली. चव्हाण म्हणाले की, "माजी मुख्यमंत्री ए. आर. आंतुले, माजी मंत्री माणिक जगताप यांच्या नावांसोबत आता भरत गोगावले यांचेही नाव जोडलं जाईल." या वक्तव्याद्वारे त्यांनी तटकरे यांच्यावर टोला लगावत, त्यांच्या राजकीय कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "तटकरे साहेबांची ही पद्धत जुनी आहे. गरज असताना जवळ घेणं आणि काम झाल्यावर दूर सारणं," असं म्हणत त्यांनी तटकरे यांच्यावर स्वार्थी वागणुकीचा आरोप केला. चव्हाण यांनी पुढे बोलताना स्पष्ट केलं की, "सध्याचा पालकमंत्रीपदाचा वाद हा केवळ सत्तेतील तात्पुरत्या तणावाचा परिणाम नसून, त्यामागे भविष्यातील राजकीय समीकरणं आणि सत्ताकेंद्रांची घुसमट दडलेली आहे. निवडणुकीच्या आधी हे सगळे एकत्र नांदत होते, पण आता मात्र रेड्याची झुंज सुरु झाली आहे," असं म्हणत त्यांनी सत्ताधाऱ्यांमधील अंतर्गत संघर्षावर बोट ठेवलं. या घडामोडींमुळं रायगड जिल्ह्यातील राजकारण तापलं आहे.

# अंबरनाथ एमआयडीसीतील 1400 कंपन्या परराज्यात जाणार?

## गुंडगिरी, दलालांमुळे उद्योजक हवालदिल

प्रतिनिधी
■ अंबरनाथ

आनंद नगर एमआयडीसी मधील कारखानदारांना आवश्यक सुविधा मिळवण्यासाठी झगडावे लागते. इतकेच नाही तर स्थानिक दलालांमुळे जागेचे भाव वाढून, बांधकामासाठी लागणारे साहित्य देखील माथी मारण्यासाठी दादागिरी व दहशत पसरवली जात असल्याने येथील कारखानदार हवालदिल झाले आहेत. त्यामुळे येथील बहुतांश कंपन्या गुजरात व तेलंगणा येथे स्थलांतरित होण्याच्या मानसिकतेत असल्याचा इशारा अंबरनाथ डिशनल मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन अर्थात आमा संघटनेने दिला आहे.



सोमवारी आमा संघटनेने घेतलेल्या पत्रकार परिषदेत आपली व्यथा मांडली. अंबरनाथ आनंद नगर एमआयडीसीत साधारण 1400 हून जास्त कंपन्या आहेत. या कंपन्यांच्या माध्यमातून 50 ते 60 हजार कोटी रुपयांची उलाढाल वर्षाकाठी होत असतानाही येथील कंपन्यांना आवश्यक सुविधा पुरवण्यात राज्य शासन उदासीन असल्याने कारखानदार हवालदिल झाले आहेत.या अवस्थेची कामगार मंत्री व राज्य सरकार यामध्ये कोणतीही दखल घेत नसल्याने कारखानदार नाराजी व्यक्त करत आहेत.

सुविधांचा अभाव व दलालांचा प्रचंड त्रास यामुळे याआधी काही मोठ्या कंपन्या गुजरात व तेलंगणा येथे स्थलांतरित झाल्या आहेत. त्यामुळे 8 ते 10 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक परराज्यात गेली असल्याचे आमा संघटनेचे अध्यक्ष उमेश तायडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# सोशल मीडिया इन्फ्लुएंसर असफिया खानचा अपघातात मृत्यू

प्रतिनिधी
■ पनवेल

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील पुणे लेनवर कोन गावाजवळ झालेल्या एका भीषण अपघातात प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएंसर असफिया बानो मोहम्मद फरीद खान (वय 22, रायबरेली, उत्तर प्रदेश) हिचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत तिच्या सोबत प्रवास करणारे चार सहकारी गंभीर जखमी झाले आहेत.

पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, टोयोटा अर्बन क्रुझर कार क्रमांक UP 32 MU 2287चा चालक नूर आलम खान (वय 34) याने निष्काळजीपणे व वेगाने वाहन चालवले. अचानक नियंत्रण सुटल्याने कारने 3 ते 4 वेळा पलटी घेतल्याचे प्रत्यक्षदर्शीने सांगितले. अपघात एवढा जबर होता की कारचा अक्षरशः चुराडा झाला आहे.

या अपघातात असफिया खान हिला गंभीर दुखापत झाली होती. तसेच तिचे सहकारीही जखमी झाले होते. घटनास्थळावरून सर्व जखमींना तात्काळ MGM रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच असफियाने प्राण सोडले. या घटनेत 4 जण गंभीर जखमी झाले आहेत. असफिया खान ही सोशल मीडियावरील लोकप्रिय चेहरा होती. इंस्टाग्रामवर तिचे अडीच लाखांहून अधिक फॉलोअर्स होते. ती आपल्या लाइफ स्टाइल, प्रवास, फॅशन आणि ब्लॉग व्हिडिओंसाठी ओळखली जात असे.

# कल्याण डोंबिवलीत शुक्रवारी महापालिकेसमोरच मटण विक्री

प्रतिनिधी
■ कल्याण

येत्या शुक्रवारी १५ ऑगस्ट, स्वातंत्र्यदिनी कल्याण डोंबिवली पालिकेने ३९ वर्षापूर्वीच्या शासन आदेशाचा आधार घेऊन पालिका हद्दीतील कत्तलेखाने बंद ठेवण्या बरोबर शहरातील मटण, मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचा आदेश काढला आहे. या फतव्यावरून विविध क्षेत्रातून तीव्र उमटल्या आहेत. पालिकेच्या या निर्णयाचा निषेध करणारा फलक हिंदु खाटिक समाज संघटनेने पाालिकेच्या कल्याणमधील मुख्यालयासमोर लावला आहे.

पालिकेच्या मनमानी कारभाराचा या फलकाच्या माध्यमातून निषेध व्यक्त करण्यात आला आहे. मागील अनेक वर्षात कल्याण डोंबिवली पालिकेत शेकडोच्या संख्येने शासन अध्यादेश आले. त्याची



अंमलबजावणी कधी शासनाने प्रभावीपणे केली नाही. ती अंमलबजावणी केली असती तर आता ही दोन्ही शहरे स्वच्छ, सुंदर आणि बकालपणापासून वाचली असती. बेकायदा बांधकामे नियंत्रणाचे शासन आदेश काटेकोर पाळले असते तर शहरात बेकायदा बांधकामांचे पीक आले नसते. आता जुनापुराणा एक आदेश काढून शासन शहरातील मटण मांस विक्रीची दुकाने बंद ठेवत असेल. या व्यवसायातील लोकांच्या रोजीरोटीवर गदा आणत असेल तर पालिका अधिकाऱ्यांची कीव येते, अशी प्रतिक्रिया ठाकरे गटाचे कल्याणमधील माजी शहरप्रमुख सचिन बासरे यांनी दिली आहे. हिंदु खाटिक समाजाच्या कल्याण डोंबिवली शाखेने पालिकेच्या मुख्यालयासमोर फलक लावून पालिकेच्या या मनमानी निर्णयाचा निषेध करणारा फलक लावला आहे.

# ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

■ नवी मुंबई

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (2) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत चंद्राबाई हाईटच्या



बाजूला, से-02, ऐरोली, नवी मुंबई व समृद्धी हॉटेल, प्लॉट नं- 22, से-01, ऐरोली, नवी मुंबई येथे श्री. विनोद कांबळे व श्री. विनोद छगनभाई जजोरिया यांनी बांधकाम परवानगी व्यतिरिक्त अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते. सदर परवानगी व्यतिरिक्त करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याच्या कार्यशाळेची इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये दखल

## केडीएमसी पालिका आणि एज्युकेशन टुडे फाऊंडेशनतर्फे

प्रतिनिधी
■ कल्याण

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी पर्यावरण पुरक म्हणजेच शाडु मातीच्या श्री गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यासाठी जनमानसामध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीकोनातून कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या पर्यावरण आणि प्रदुषण नियंत्रण विभागामार्फत कै.ह.भ.प.सावळाराम महाराज क्रीडा संकुलातील कै.सुरेंद्र वाजपेयी बंदीस्त सभागृहात आज दि.12/08/2025, अंगारक चतुर्थीच्या दिवशी कल्याण-डोंबिवली परिक्षेत्रातील



महापालिकेच्या शाळा, खाजगी शाळा, विनाअनुदानीत शाळांमधील शालेय विद्यार्थ्यांसाठी शाडु मातीच्या श्री गणेश मूर्ती बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेस शालेय विद्यार्थ्यांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहून, अभूतपूर्व प्रतिसाद दिला. सकाळी 08.00 पासूनच डोंबिवलीतील कै.सुरेंद्र वाजपेयी बंदीस्त सभागृह चिमुकल्या मुलांच्या किलबिलाटाने भरुन गेले होते. तन्मयतेने आणि आपले भान हरपून शाडु मातीच्या श्री गणेशाच्या मूर्ती साकारणाऱ्या या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कला कौशल्याला मा.आमदार राजेश मोरे, महापालिका आयुक्त अभिनव गोयल, पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे यांनी देखील मनापासून दाद दिली.

पर्यावरण पूरक श्री गणेशोत्सव साजरा व्हावा, जास्तीत जास्त नागरीकांनी पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करावी आणि शालेय विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्ती स्थापनेची भावना रुजवावी, म्हणून "हरित बाप्पा, फलित बाप्पा" या संकल्पनेवर आज या कार्यशाळेचे आयोजन आज केले असल्याची माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली.

# पालिकेकडून टीबी रुग्णांना मिळणार महिन्याभराची औषधे एकाचवेळी

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल महापालिकेमध्ये सोमवारी राष्ट्रीय क्षयरोग (टीबी) दूरीकरण कार्यक्रमाचा आढावा पालिका आयुक्तांनी घेऊन टीबी मुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी या बैठकीत महत्वाच्या सूचना वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना दिल्या. या सूचनांमध्ये टीबी रुग्णांना यापुढे आठवड्याऐवजी महिन्याची एकदाच औषधे महापालिकेच्या आरोग्य विभागाने द्याव्यात तसेच क्षयरोग रूग्णांपर्यंत महापालिकेचे आरोग्य विभाग लवकर पोहचण्यासाठी खाजगी रूग्णालयांनी तसेच थुंकी, रक्त व लघवी तपासणी करणा-या प्रयोगशाळा चालकांनी (लॅब) क्षयरोग रुग्ण तसेच संशयित रूग्णांची महापालिकेकडे नोंदणी करण्यासाठी संबंधित आस्थापनांना पत्राने तातडीने कळवा असा सूचना आयुक्तांनी केल्या.

पनवेलमध्ये महापालिकेच्यावतीने टीबी मुक्त भारत अभियानाची अमंलबजावणीसाठी सोमवारी पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत अति जोखीमग्रस्त क्षय रूग्णांना उपचाराखाली आणून क्षयरोग निमुर्लन करण्याच्या दृष्टीने विविध उपायांवर चर्चा करण्यात आली. यावेळी टीबी फोरमचे उपाध्यक्ष प्रसेनजित कारलेकर, सचिव मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, जागतिक आरोग्य संघटनेच्या ठाणे मंडळाच्या सल्लागार डॉ. ज्योती साळवे, माजी नगरसेवक डॉ.अरूण भगत, इंडीयन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गुणे, बालरोग तज्ज्ञ डॉ.जय भांडारकर, एमजीएम क्षयरोग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रदीप पोतदार, मधुमेह तज्ज्ञ डॉ. कीर्ती समुद्र, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, पालिका वैद्यकिय अधिकारी उपस्थित होते.

# भिवंडीत 31 कोटींचा एमडी ड्रग्स जप्त; दोघेजण ताब्यात

प्रतिनिधी
■ भिवंडी

अंमली पदार्थांची तस्करी करण्यास बंदी असताना देखील त्याची वाहतूक केली जात आहे. अशात भिवंडीत कारमधून एमडी ड्रग्सची तस्करी करताना भिवंडी पोलिसांनी सापळा रचत कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे १५ किलो ९२४ ग्रॅम वजनाचा एमडी अमली पदार्थाचा साथ जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत इतक्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ आढळल्याने खळबळ उडाली आहे.

पोलिसांना गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार वाहन रांजणोली भिवंडी बायपासजवळ या ठिकाणी दोन इसम अमली पदार्थ विक्रीकरिता येणारा असल्याची माहिती मिळाली होती. यानंतर पोलिसांनी महामार्गावर सापळा रचून कारवाई केली आहे. यात दोन सराईत आरोपींना वाहनांसह अटक केली असून ३१ कोटी ८४ लाख ८० हजार रुपये किमतीचा १५ किलो ९२४ ग्रॅम वजनाचा अमली पदार्थ गुन्हे शाखा घटक दोन भिवंडी पथकाने जप्त केला. सदरच्या कारवाई दरम्यान तनवीर अहमद कमर अहमद अन्सारी व महेश हिंदुराव देसाई या दोन तरुणांना पोलिसांनी अटक केली आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक 2025 वक्तृत्व स्पर्धेतून 'शाळा अंतर्गत फेरी' उत्साहात पूर्ण

प्रतिनिधी
■ पनवेल

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांना आपली मते प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी आणि वक्तृत्वकौशल्य विकसित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'शाळा अंतर्गत फेरी' उत्साहात पार पडली.



विद्यार्थ्यांनी माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, स्वच्छ भारत, प्लास्टिक मुक्त भारत, मोबाईल नसते तर?, इंटरनेट – वरदान की शाप? अशा विविध विषयांवर जोशपूर्ण आणि प्रभावी भाषणे दिली. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, विचार मांडण्याची क्षमता सुधारली आणि स्टेज भीती कमी झाली. या फेरीतून प्रत्येक इयत्तेतून ३ विद्यार्थी पुढील अंतरशालेय फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी स्पर्धात्मक भावना निर्माण झाली असून पुढील फेरीसाठी उत्सुकता वाढली आहे.

# शिक्षणाच्या उद्देशाने झपाटलेला विद्यार्थी पोलादपूरमध्ये तयार झाला पाहिजे

## आ. प्रविण दरेकरांचे आवाहन

प्रतिनिधी
■ पोलादपूर

शिक्षणाला पैसा लागत नाही. शिक्षणासाठी चांगला अभ्यास केला पाहिजे. शिक्षणाच्या उद्देशाने झपाटलेला विद्यार्थी आपल्या पोलादपूर तालुक्यात तयार झाला पाहिजे, असे आवाहन भाजपा गटनेते आणि पोलादपूर तालुक्याचे भूमिपूत्र आमदार प्रविण दरेकर यांनी विद्यार्थी वर्गाला केले. आज कालकाई माता क्रीडा व सामाजिक संस्था कोतवालच्या वतीने पोलादपूर तालुक्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आणि माध्यमिक शाळेतील २० खेळाडूंना मोफत स्पोर्ट्स गणवेश वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



त्या कार्यक्रमात आ. दरेकर बोलत होते.

सदर कार्यक्रमाला भाजपा रायगड सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, भाजपा स्थानिक नेते प्रसन्न पलांडे, भाजपा तालुकाध्यक्ष वैभव चांदे, शिवसेनेचे निलेश अहिरे, तालुक्याच्या गटविकास अधिकारी दीप्ती गाट, कृष्णा दरेकर, अनिल मोरे, कोतवालच्या सरपंच रेखा दळवी, अविनाश शिंदे, निलेश तळवटकर, जमीर धामणकर, रामदास कळंबे, संदीप ठोंबरे, गोविंद चोरगे, संदेश कांबळे, श्रीधर जाधव, कार्यक्रमाचे आयोजक राजेश सकपाळ यांसह मोठ्या संख्येने तालुक्यातील नागरिक, विद्यार्थी आणि पालक वर्ग उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. दरेकर म्हणाले कि, एखाद्या कार्यक्रमाचे सातत्य ठेवणे, विद्यार्थ्यांसाठी विचार करणे, तालुक्याचा विचार करणे आणि त्यात आपले योगदान देणे हा विचार खऱ्या अर्थाने उद्याच्या पिढीला प्रेरणादायी व दिशादर्शक ठरेल. जगात कुठलीही गोष्ट अशक्य नाही. मनाचा निर्धार पक्का असेल, कष्ट करण्याची तयारी असेल तर वाटेल ते यश खेचून आणण्याची क्षमता माझ्या विद्यार्थी व तालुक्यात आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यात काय केले पाहिजे? त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याची जबाबदारी अशा प्रकारच्या कार्यक्रमांतून संयोजकांची असते. माझ्या मनात खंत आहे कि माझ्या तालुक्याचा ज्या पद्धतीने सर्वांगीण विकास व्हायला पाहिजे, तशा प्रकारचे नियोजनबद्ध व दिशादर्शक काम झाले नाही. मागासलेल्या तालुक्याचा शिक्का मी ज्या मातीतून आलो त्यावर आहे.

# घरो घरी तिरंगा मोहिमेंतर्गत शाळा महाविद्यालयात पत्रलेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, प्रतिज्ञा

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल महानगरपालिकेमार्फत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'घरोघरी तिरंगा- हर घर तिरंगा' मोहिम 15 ऑगस्ट पर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबविली जात आहे. या मोहिमेंतर्गत नुकतेच महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळा महाविद्यालयांमध्ये पत्रलेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, प्रतिज्ञा घेण्यात आली.

देशवासियांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्र ध्वजाबद्दल जागरूकता वाढविण्याच्यादृष्टीने ' घरोघरी तिरंगा' ही लोकचळवळ



राबविण्यात येणार आहे. या मोहीम अंतर्गत पनवेल महानगरपालिके मार्फत लोकनेते रामशेठ ठाकूर शाळा कामोठे, डीएसपी इंटरनॅशनल स्कूल कामोठे ,एमएनआर स्कूल ऑफ एक्सलन्स कामोठे , शांतिनिकेतन स्कूल पनवेल, गोखले एज्युकेशन सोसायटी खारघर, रॅडक्लिफ स्कूल खारघर, श्री सुविद्या शाळा कामोठे, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर, रामशेठ ठाकूर कनिष्ठ महाविद्यालय खारघर, पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पनवेल अशा विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये पत्र लेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. तसेच या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले.याबरोबरच प्रतिज्ञा घेण्यात आली.

## 34 हजार लाभार्थींचे स्वस्त धान्य बंद होणार

**नाशिक :** ज्या शिधापत्रिकाधारकांनी मागील सहा महिन्यांत धान्याची उचल केलेली नाही, अशा लाभार्थींचे धान्य शासन आदेशाने बंद करण्यात येणार आहे. याबाबत जिल्हा पुरवठा विभागाने पडताळणी सुरू केली असून, १२ हजार ६५३ शिधापत्रिकांवरील ३३ हजार ९५९ लाभार्थींनी सहा महिन्यांपासून धान्याची उचल केलेली नाही. एकूणच खातरजमा झाल्यानंतर संबंधितांचा स्वस्त धान्यपुरवठा बंद केला जाणार आहे. अनेक वेळा असे आढळले आहे की, अनेक शिधापत्रिकाधारक दर महिन्याला मिळणारे धान्य उचलत नाहीत, त्यामुळे या शिल्लक धान्याचा हिशेब लावताना शासनाची दमछाक होते. नाशिक जिल्ह्यातील अशा ३३ हजार ९५९ लाभार्थींचे धान्य बंद करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. सध्या प्रत्येक स्वस्त धान्य दुकान स्तरावर लाभार्थींची पडताळणी सुरू करण्यात आली असून, काम पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. याशिवाय ज्यांच्या दारापुढे कार आहे अथवा कुटुंबातील एखादी व्यक्ती आयकर भरत असेल अशा लाभार्थींची माहिती संकलित करीत त्यांचेही धान्य बंद करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया केंद्रीय स्तरावरून सुरू झाली आहे.



### म ह त्त्वा चे

## गोंदियात पालिकेच्या 14 शाळांमध्ये केवळ 695 विद्यार्थी

**गोंदिया :** एका खासगी शाळेत हजारावर विद्यार्थी पटसंख्या असताना नगर परिषदेच्या शाळांना मात्र घरघर लागली आहे. नगर परिषदेच्या 14 प्राथमिक शाळांमध्ये फक्त 695 विद्यार्थी असून, त्यातही कित्येक शाळांमध्ये तर बोटांवर मोजण्याइतकेच विद्यार्थी असल्याची आश्चर्यजनक बाब आहे. यावरून नगर परिषद शाळांची काय अवस्था झाली आहे, यावर प्रशासन व नगरसेवकांनी मंथन करण्याची गरज आहे. एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी शासनाने शिक्षणाचा अधिकार अमलात आणला आहे. याशिवाय, गरीब पालकांवर विद्यार्थ्यांच्या कार्यालय नगर परिषद गोंदिया शिक्षणाचा बोजा पडू नये, यासाठी विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशासह गणवेश, पाठ्यपुस्तक, जोडे-मोजे, पोषण आहार यासह अन्य शैक्षणिक साहित्य व सुविधा पुरवल्या जात आहेत; मात्र यानंतरही शासकीय शाळांकडे विद्यार्थी व पालकांचा कल कमी झाल्याची वास्तविकता आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये आता नवनवे उपक्रम राबवले जात असल्याने जिल्हा परिषद व शाळांकडे विद्यार्थी पालकांचा कल वाढत असल्याची वास्तविकता नाकारता येत नाही. ३११ पटसंख्या नगर परिषदेच्या हिंदी शाळांमध्ये आहे.

## पोलीस निरीक्षकाकडून होमगार्डला मारहाण

**नांदेड :** नांदेड शहरात कर्तव्यावर असणाऱ्या एका होमगार्डला वजीराबाद पोलीस निरीक्षकाकडून मारहाण करण्यात आल्याची तक्रार समोर आली आहे. कर्तव्य बजावत असताना कामात कसूर केल्यावरून मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान मारहाण झाल्याने पाठीवर तीन वळ उमटले असल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले असून या प्रकरणी चौकशी सुरु आहे. नांदेड शहरातील तिरंगा चौकात वाहतूक सुरळीत करण्याची जबाबदारी गृहरक्षक दलाचे जवान कैलाश गंगाराम हिंगोले यांच्याकडे सोपविण्यात आली होती. त्यानुसार कैलास हिंगोले हे कर्तव्य बजावत असताना आपला कर्तव्यात कुचराई करत असल्याप्रकरणी वजीराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी त्यांना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी हिंगोले यांनी तक्रार देखील केली आहे. दरम्यान या प्रकरणानंतर हिंगोले यांच्याकडून तक्रार करण्यात आली असून या प्रकरणाची चौकशी आता अप्पर पोलीस अधीक्षक तथा गृहरक्षक दलाचे जिल्हाप्रमुख सुरज गुरव यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

# मालेगावात तीन दिवस मटण शॉप, कत्तलखाने बंद

### संभाजीनगरमध्येही 15, 20 आणि 27 ऑगस्ट रोजी नॉन व्हेज बंदी

प्रतिनिधी
■ नाशिक

सणासुदीच्या काळात कत्तलखाने व मांसविक्री बंद ठेवण्याची मागणी करत प्रशासनाला निवेदन दिले जात आहे. राज्यातील विविध जिल्ह्यात काही हिंदू संघटना व बांधवांकडून ही मागणी केली जात असून मालेगाव आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये यासंदर्भाने निर्णयही घेण्यात आला आहे.

धार्मिक सणांच्या पार्श्वभूमीवर मालेगाव महानगरपालिकेने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, मालेगाव शहरातील सर्व खासगी कत्तलखाने, म्हैस मांस विक्रेते, बकरा मटन व कोंबडी मटन विक्रेते यांनी आपली दुकाने 15, 20 आणि 27 ऑगस्ट या दिवशी पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, छत्रपती संभाजीनगरमध्येही 15 ऑगस्ट रोजी शहरातील सर्व कत्तलखाने बंद राहणार आहेत. महानगरपालिकेच्या आदेशानुसार 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन, श्रीकृष्ण जयंती 20 ऑगस्ट आणि जैन पर्युषण पर्व व 27 ऑगस्ट श्री गणेश चतुर्थी, जैन संवत्सरी असल्याने या तिन्ही दिवशी सर्व मांस दुकाने, कत्तलखाने आणि संबंधित व्यवसाय पूर्ण दिवस बंद ठेवण्यात यावे. धार्मिक सौहार्द, सार्वजनिक शांतता आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन तसेच केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शनानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.




**स्वातंत्र्यदिनी अशी बंदी घालणे उचित नाही- अजित पवार**

अजित पवार म्हणाले, ज्यावेळेस श्रद्धेचा प्रश्न असतो त्यावेळेस अशा प्रकारची बंदी घातली जाते. आषाढी असेल, महाशिवरात्री असेल, महावीर जयंती असेल, अशा काही महत्त्वाच्या दिवस असतात त्यावेळेस बंदी घातली जाते. आता देशाला स्वातंत्र्य मिळून 78 वर्ष होत आहेत. आपल्या देशात, राज्यात काही जण शाकाहारी आहेत तर काही मांसाहारी आहेत. आता तुम्ही कोकणात जर गेलात तर साधी भाजी करताना पण तिथे सुकट, बोंबील असलं काही त्यात घालतात. कारण, तो त्यांचा आहार आहे. त्यांचा आहार त्यांना घ्यायला बंदी घालणे हे बरोबर नाही, उचित नाही.

# गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या खासदार-आमदारांवर कायमस्वरूपी बंदीची मागणी

प्रतिनिधी
■ चिपळूण

"गुन्हेगारी पार्श्वभूमीचे खासदार-आमदार लोकशाहीसाठी घातक आहेत. निर्णय लांबवून त्यांना पाच वर्षे सत्तेचा उपभोग घेऊ देणे ही लोकशाहीची थट्टा आहे," असा घणाघात ॲड. असीम सरोदे यांनी चिपळूण येथे पत्रकार परिषदेत केला.



महाराष्ट्रातील १८३ न्यायालयांत ४४५, तर देशभरात तब्बल ८० हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे ते म्हणाले. शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख संदीप सावंत यांना २०१६ मध्ये झालेल्या मारहाण प्रकरणी ॲड. असिम सरोदे हे चिपळूणात आले होते. सरोदे हे सावंत यांचे वकील आहेत. सावंत यांची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी ते चिपळूणला आले होते.

यावेळी पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले,"शिक्षा झालेल्यांना फक्त सहा वर्षे बंदी हा कायद्याचा विनोद आहे. कायमस्वरूपी बंदीच हवी," अशी ठाम मागणी करताना त्यांनी निवडणूक आयोगावरही शंका व्यक्त केली. "राहुल गांधींनी दाखवलेली कागदपत्रे खरी नसतील, तर आयोगाने प्रतिज्ञापत्र देऊन ती खोटी ठरवावी आणि राहुल गांधींवर गुन्हा दाखल करावा," असा सरळ सवाल त्यांनी केला.

शिवसेना धनुष्यबाण चिन्ह प्रकरणात शिंदे गटावर हल्लाबोल करत सरोदे म्हणाले, "शिंदेंसोबत गेलेले सर्व अपात्र आहेत. हा 'अलीबाबा आणि चाळीस चोरांचा' प्रकार आहे. उद्धव ठाकरे यांची बाजू संविधानिक आहे. सर्वोच्च न्यायालयाने धनुष्यबाण गोठवावा किंवा शिंदेंकडून काढून घ्यावा. असा निर्णय आल्यास महाराष्ट्राचे राजकीय गणित बदलेल. "भारतामध्ये न्याय आहे, पण तो चांगल्या न्यायाधीशांच्या शोधात आहे. सर्वोच्च न्यायालयातील वातावरण बदलत आहे. सत्ता आणि ताकदीचा गैरवापर करणाऱ्यांचा पर्दाफाश व्हायलाच हवा," असेही सरोदे म्हणाले.

# तुळजापुरात भाजप अन् जितेंद्र आव्हाडांचे कार्यकर्ते आमनेसामने

प्रतिनिधी
■ तुळजापुर

तुळजाभवानी मंदिराबाहेर जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते आणि भाजप कार्यकर्ते आमनेसामने आलेत. भाजप कार्यकर्त्यांनी जितेंद्र आव्हाडांच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी केली. भाजप कार्यकर्त्यांनी जितेंद्र आव्हाड यांची कार अडवलीय. आई तुळजाभवानी देवीच्या मंदिराच्या शिखरावरून वाद सुरू आहे. या वादात जितेंद्र आव्हाड यांनी उडी घेतली आहे. आई तुळजाभवानी देवीच्या शिखराला हात लावू देणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतलीय.

तुळजाभवानी मंदिराची पाहणी करून जितेंद्र आव्हाड यांनी आपली मंदिराच्या विकासाबाबतची भूमिका पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केली. कोणत्याही परिस्थितीत तुळजाभवानी मंदिराच्या गाभाऱ्याला हात लावू देणार नाही. ज्या पायऱ्यांवरून छत्रपती शिवाजी महाराज गेले त्या पायऱ्या आणि देवीच्या गाभाऱ्याला हात लावू देणार नाही.

यावेळी त्यांनी मंदिराच्या विकासाला विरोध नाही. तर ऐतिहासिक संदर्भ असलेल्या मंदिरातील वास्तु हलवू देणार नाही, असा इशारा दिला. आव्हाडांच्या या भूमिकेनंतर संतप्त भाजप कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत, मंदिराबाहेर आवड्यांची गाडी अडवली. आवड आणि हिंदू धर्म आणि देवीचा अवमान केल्याचा आरोप करत भाजप कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

# जरांगेंचा मुंबईत दंगल घडवण्याचा डाव

### ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचा दावा

प्रतिनिधी
■ बीड

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा मुंबईत जाळपोळ व दंगल घडवण्याचा कट आहे. त्यामुळेच ते ऐण सनावारांच्या दिवसांत मुंबईला जात आहेत, असा दावा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मंगळवारी केला. या प्रकरणी त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जरांगेंना आंतरवाली सराटीतच रोखण्याचे आवाहनही केले आहे.

मनोज जरांगे येत्या 29 ऑगस्टपासून मुंबईत मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणार आहेत. ते आपल्या समर्थकांसह आझाद मैदानावर उपोषणाला बसणार आहेत. सध्या ते पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर जाऊन याविषयी वातावरण



निर्मिती करत आहेत. त्यांच्या या आंदोलनाची तारीख जसजशी जवळ येत आहेत, तसतसे राज्याचे राजकारण तापत आहे. या पार्श्वभूमीवर लक्ष्मण हाके यांनी त्यांच्यावर निशाणा साधला आहे.

लक्ष्मण हाके मंगळवारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, मनोज जरांगे यांनी बीड शहर जाळले. त्यांना त्याच गोष्टी मुंबईत जाऊन करायच्या आहेत. यासाठीच त्यांनी गणेशोत्वसाची तारीख निवडली. मुंबईला जायचे आणि दंगल घडवून आणायची हाच एकमेव कार्यक्रम त्यांचा आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माझी विनंती आहे की, त्यांनी जरांगे यांचा सणासुदीच्या वातावरणात जाळपोळ करण्याचा डाव रोखावा. त्यांना आंतरवाली सराटीतच उपोषण करण्याची परवानगी द्यावी. मनोज जरांगे यांची बाषा प्रक्षोभक व चिथावणीखोर आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना तुरुंगात डांबावे. त्यांची मागणी अवैध आहे. त्यानंतरही सरकार त्यांचे लाड का करत आहे? जरांगे यांनी थोडासा अभ्यास करून हिंदी विषयाचे अवलोकन करावे, असे ते म्हणाले.

# गुहागरमध्ये पेढा खाल्ल्याने 11 महिलांना विषबाधा

### रुग्णालयात उपचारांसाठी दाखल

■ गुहागर

गुहागरतालुक्यातील शृंगारतळी येथील एका बेकरीमधून आणलेला पेढा खाल्ल्याने ज्वेलरीच्या दुकानात काम करणाऱ्या ११ महिलांना विषबाधा झाल्याचा प्रकार सोमवारी सकाळी घडला. या महिलांना तत्काळ शृंगारतळीतील एका खासगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

शृंगारतळी येथील ग्रामपंचायत पाटपन्हाळेच्या पाठीमागे एका इमारतीत ज्वेलरीचे दुकान आहे. ज्वेलरीचे मालक महिलांच्या हाताला काम मिळावे म्हणून मुंबईहून ज्वेलरीचे साहित्य आणून ते महिलांकडे देतात. त्यातून या महिला ज्वेलरी तयार करतात. श्रावण महिना असल्याने या ठिकाणी काम करणाऱ्या एका महिलेने सोमवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास एका बेकरीतून पेढे आणले होते. त्यातील अर्धा-अर्धा पेढा कामावर असलेल्या महिलांना तिने दिला. काही वेळाने महिलांना चक्कर आली आणि उलटी होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे सर्व महिलांना तातडीने शृंगारतळी येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# मराठ्यांच्या नादी लागल्यास सरकार अडचणीत येईल

### मुंबईत भव्य गणेश विसर्जन मिरवणुकीची घोषणा

प्रतिनिधी
■ जालना

"मराठ्यांच्या नादी लागल्यास सरकार अडचणीत येईल," असा थेट इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. आमदार परिणय फुके यांच्या टीकेला उत्तर देताना, जरांगे यांनी सरकारवर जातीयवाद पसरवल्याचा गंभीर आरोप करत मुंबईत भव्य गणेश विसर्जन मिरवणुकीची घोषणा केली.

आपल्या चार दिवसीय दौऱ्यावर निघण्यापूर्वी अंकूशनगर



येथील निवासस्थानी माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली. ते म्हणाले, "मराठा आणि ओबीसी समाजात वाद वाढवणे राज्याच्या प्रमुखांना शोभत नाही. मराठ्यांना कमी लेखू नका आणि माझ्या नादी लागण्याचा प्रयत्न करू नका," असे म्हणत त्यांनी फडणवीसांवर निशाणा साधला.

यावेळी जरांगे यांनी मराठा आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट करताना मुंबईतील आंदोलनाची रूपरेषा जाहीर केली. २७ ऑगस्ट रोजी मराठा समाज गणपती बाप्पासह मुंबईत भव्य मिरवणूक काढेल. "आमची मुंबई, आमचा समुद्र आणि आमची संस्कृती," यावर कुणाचेही बंधन चालणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुंबईत एकाही आंदोलकावर लाठीचार्ज झाल्यास मराठा समाज आणि सरकार आमनेसामने उभे राहतील, असा इशाराही त्यांनी दिला. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळवून देण्याचा संघर्ष अंतिम टप्प्यात असल्याचे ते म्हणाले. "२९ ऑगस्टला आम्ही विजयाचा गुलाल उधळणार आणि आरक्षण मिळवणारच," असा ठाम विश्वास मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला. त्यांच्या या घोषणेमुळे मराठा आरक्षणाच्या लढाईला नवे वळण लागण्याची शक्यता आहे.

# एमआयएमच्या जिल्हा कार्यकारिणीचा सामूहिक राजीनामा

■ धुळे

धुळे शहर मतदार संघात मागील विधानसभा निवडणुकीत एमआयएम पक्षाचा आमदार निवडून आला होता. यावेळी मात्र पक्षाला यश मिळाले नसून यानंतर आता पक्षाला मोठा धक्का बसला आहे. कारण एमआयएम पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामा दिला आहे. पदाधिकाऱ्यांनी आपला राजीनामा जिल्हाध्यक्षांकडे सुपूर्द करत पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे.

धुळे शहरात एमआयएमला चांगले दिवस आले होते. मागील पंचवार्षिक निवडणुकीत फारूक शाह हे एमआयएम पक्षाच्या तिकिटावर निवडून आले होते. मात्र या निवडणुकीत त्यांचा



पराभव झाला होता. यानंतर त्यांनी काही दिवसांपूर्वी पक्षाला जय महाराष्ट्र करत राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला होता. यानंतर आता एमआयएम पक्षातील पदाधिकाऱ्यांनी देखील पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेत राजीनामा दिला आहे.

एमआयएम पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीने एक सोबतच पक्षाचा राजीनामा देत पक्षाला जय महाराष्ट्र केल्याने धुळे शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. एमआयएम पक्षाच्या धुळे शहर आणि जिल्हा कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे दिले असल्याने एमआयएम पक्षाला मोठा धक्का बसला आहे.

# जुगाराच्या अड्ड्यावर पुणे पोलिसांचा छापा

### रमी खेळताना भाजप पदाधिकाऱ्याला रंगेहात पकडलं

प्रतिनिधी
■ पुणे

पुण्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुण्याच्या धनकवडी भागामध्ये एका जुन्या पत्र्याच्या कारखान्यामध्ये जुगाराचा अड्डा सुरु होता. या अड्ड्यावर पुणे गुन्हे शाखेने छापा टाकला. छापेमारीमध्ये भाजपचा पदाधिकारी जुगार खेळताना आढळून आला. या पदाधिकाऱ्यासह सात जणांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याच्या धनकवडी भागातील एका रिकाम्या पत्र्याच्या कारखान्यात काहीजण जुगार खेळत असल्याची माहिती पुणे गुन्हे शाखेला मिळाली. त्यांनतर सहकारनगर पोलीस आणि गुन्हे शाखेच्या युनिट २ च्या पथकाने या कारखान्यावर छापा टाकला. या ठिकाणी जुगार खेळणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली. धनकवाडी येथील छाप्यामध्ये पोलिसांना भारतीय जनता पक्षाच्या पर्वती विधानसभा मतदारसंघाचा चिटणीस रमी खेळताना आढळून आला.

# मंत्री बावनकुळेंनी केले सिंधुदुर्ग पर्यटन

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याचा दोन दिवसांचा पर्यटन आणि एका दिवसाचा शासकीय दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी कुटुंबासोबत निसर्गरम्य पर्यटन स्थळांना भेटी दिल्या, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशासकीय बैठक घेतली.

११ आणि १२ ऑगस्ट रोजी मंत्री बावनकुळे यांनी पत्नीसोबत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळांना



भेटी दिल्या. त्यांनी आंबोली, वेंगुर्ले-उभादांडा, आणि मालवण-तारकर्ली येथील नैसर्गिक सौंदर्याचा अनुभव घेतला. आंबोलीला 'दक्षिण कोकणचे महाबळेश्वर' म्हणूनही ओळखले जाते. या खासगी दौऱ्यात त्यांनी सरकारी लवाजमा टाळला असला तरी, त्यांच्यासोबत प्रांताधिकारी आणि तहसीलदार उपस्थित होते. आंबोली येथे माजी शिक्षणमंत्री आमदार दीपक केसरकर यांनी त्यांचे स्वागत केले. आंबोली भेटीदरम्यान, स्थानिक रहिवाशांनी त्यांच्यासमोर कबुलायतदार गावकर जमिनीचा प्रश्न मांडला. आंबोलीच्या सरपंच सावित्री पालेकर आणि माजी सरपंच शशिकांत गावडे यांनी निवेदन देऊन या समस्येची गांभीर्याने दखल घेण्याची विनंती केली.

# लोकशाही संपवण्याचे भाजपचे षडयंत्र - चेन्नीथला

### ■ फडणवीस मुख्यमंत्री आहेत का निवडणूक आयुक्त?
### ■ काँग्रेसच्या दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप

प्रतिनिधी
■ खडकवासला

भारतीय जनता पक्ष देशातील लोकशाही व संविधान संपवण्याचे काम करत आहे. निवडणूक आयोगाच्या मदतीने मतचोरी केली जात आहे. महाराष्ट्र, हरियाणा, कर्नाटकातील मतचोरी राहुल गांधी यांनी उघड केली आहे. लोकशाही व संविधान आज धोक्यात असून ते वाचवण्यासाठी राहुल गांधी संघर्ष करत आहेत, ही लढाई मोठी व कठीण आहे. पण आपण सर्वजण राहुलजींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून हा लढा जिंकू, असे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले.

काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप झाला. यावेळी प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार,





विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील, बाळासाहेब थोरात, नसीम खान, माजी मंत्री डॉ. नितीन राऊन, यशोमती ठाकूर, अमित देशमुख, डॉ. विश्वजित कदम, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे अध्यक्ष पवन खेरा, बी. एम संदीप, यु बी. व्यंकटेश, रामकिशन ओझा, पृथ्वीराज साठे, ॲड. गणेश पाटील, अतुल लोंढे, महिला प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, शिवराज मोरे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, देश कठीण परिस्थितीतून जात आहे. शेजारी देशांशी आपले चांगले संबंध नाहीत, अमेरिका भारताला धमकी देत आहे पण पंतप्रधान त्यावर काहीच बोलत नाहीत. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना अमेरिकाच काय कोणत्याही देशाने भारताला धमकी देण्याचे धाडस केले नाही. राहुल गांधी चीनबद्दल काही बोलले तर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश त्यावर टिप्पणी करतात. आता न्यायालय देशप्रेमी कोण हे ठरवणार का, असा प्रश्न त्यांनी विचारला. महाराष्ट्रातील भाजपाचे सरकार सर्वात भ्रष्ट असून कृषी मंत्री विधानसभेत रमी खेळतो, तर गृहराज्यमंत्री डान्सबार चालवतात असे चेन्नीथला म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांचा समाचार घेत चेन्नीथला म्हणाले की, राहुल गांधी यांनी प्रश्न निवडणूक आयोगाला विचारले त्यावर आयोगाने उत्तर दिले पाहिजे पण फडणवीस उत्तर का देत आहेत. फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत का निवडणूक आयुक्त? असे चेन्नीथला म्हणाले.

# गणपतीपुळे येथे अंगारकी चतुर्थी निमित्त भक्तांचा महासागर

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

गणेश भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या रत्नागिरीतील गणपतीपुळे या ठिकाणी अंगारकी चतुर्थी निमित्त भक्तांचा महासागर लोटला. मंगळवारी पहाटे साडेतीन वाजल्यापासून श्रींचे दर्शनासाठी रांगा लावण्यास सुरुवात झाली. रत्नागिरीतील गणपतीपूळे या ठिकाणी अंगारकी चतुर्थी निमित्त स्थानिक तसेच परजिल्ह्यातील भाविकांनी गणेश दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली. जणू याठिकाणी गणेश भक्तांचा महासागरच लोटला.

गणपतीपुळे येथील गणेश मंदिरात साजरी होणारी अंगारकी चतुर्थीसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविकांनी सोमवार पासूनच मोठी गर्दी करण्यास सुरुवात केली होती. याठिकाणी सोमवारी रात्री पासूनच दाखल झालेल्या भाविकांनी मध्यरात्रीपासूनच रांग लावण्यास सुरुवात केली. पहाटे साडेतीन वाजल्या पासून मंदिरात गणेश दर्शनाला सुरुवात करण्यात आली. अंगारकीनिमित्त येणारे भाविक लक्षात घेऊन गणपतीपुळे देवस्थानकडून पहाटे लवकर पूजा करून साडेतीन वाजल्यापासूनच श्रींच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले.

**PUBLIC NOTICE**

Public Notice is hereby given that **Rafique Ahmed Mobin Ahmed Shaikh** (DOB 06/03/1984) son of Mobin Ahmed Shaikh, currently living at address Plot No. 8/E/2, Nr. Sanjay Nagar Municipal School, Baigan wadi, Govandi, Mumbai - 400043. I Rafique Ahmed Shaikh have since applied for my **Birth Certificate** at Tehsildar Off., Kurla-Mulund, Mumbai.
I hereby legally invite claims from any / all having any objections / claims **within 15 days** from the date of publication of this notice with supporting documents. If not, thereafter all objections / claims will be considered null & void.
Date: **13 August 2025**
Sd/-
**Mr. Rafique Ahmed Shaikh**
Call - **9082414623**

**PUBLIC NOTICE**

Public Notice is hereby given that **Munshi Abdul Razzak Abdul Latif Shaikh** (Died on 19/04/2018) husband of Asgari Begam Shaikh, was living at Ajmeri Masjid, Plot No. 34/H/12, Road No. 6, Shivaji Nagar, Govandi, Mumbai - 400043. I Asgari Begam Shaikh have since applied for his **Death Certificate** at Tehsildar Off., Kurla-Mulund, Mumbai.
I hereby legally invite claims from any / all having any objections / claims **within 15 days** from the date of publication of this notice with supporting documents. If not, thereafter all objections / claims will be considered null & void.
Date: **13 August 2025**
Sd/-
**Mrs. Asgari Begam Shaikh**
Call - **9967001492**

## शुभमन गिल आयसीसी 'प्लेयर ऑफ द मंथ' - बेन स्टोक्स, वियान मुल्डरला टाकले मागे


**लंडन :** टीम इंडियाचा कसोटी कर्णधार शुभमन गिलला आयसीसीने जुलै महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार दिलाय. त्याने या शर्यतीत इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स आणि दक्षिण आफ्रिकेचा अष्टपैलू खेळाडू वियान मुल्डर यांना मागे टाकले. जून ते ऑगस्ट दरम्यान इंग्लंडमध्ये खेळल्या गेलेल्या अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीमध्ये शुभमनने ४ शतके झळकावली होती. महिला क्रिकेटमध्ये इंग्लंडची फलंदाज सोफिया डंकली हिला हा पुरस्कार मिळाला. तिने तिच्याच संघाची सोफी एक्लेस्टोन आणि आयर्लंडची कर्णधार गॅबी लुईस यांना मागे टाकले आहे. जुलैमध्ये, २५ वर्षीय शुभमनने ३ कसोटी सामन्यांमध्ये ९४.५० च्या सरासरीने ५६७ धावा केल्या. यामध्ये एक द्विशतक आणि २ शतकांचा समावेश होता. ऑगस्टमध्ये झालेल्या मालिकेत त्याने शतक ठोकले होते, त्यामुळे जुलैच्या धावसंख्येत त्याचा समावेश नव्हता. गिलला चौथ्यांदा 'आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ' पुरस्कार मिळाला आहे.इंग्लंडविरुद्ध अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीमध्ये शुभमन गिल मालिकावीर ठरला आहे. आयसीसीने २०२१ मध्ये महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार देण्यास सुरुवात केली. तेव्हापासून शुभमन गिलने चौथ्यांदा हा पुरस्कार जिंकला आहे. यासह तो सर्वाधिक वेळा हा पुरस्कार जिंकणारा पुरुष खेळाडू बनला आहे. गिलने या वर्षी फेब्रुवारीमध्येही हा पुरस्कार जिंकला होता. त्याच वेळी, त्याला २०२३ मध्ये दोनदा हा पुरस्कार मिळाला. महिला खेळाडूंमध्ये ऑस्ट्रेलियाच्या ॲशले गार्डनर आणि वेस्ट इंडिजची कर्णधार हेली मॅथ्यूज यांनीही प्रत्येकी ४ वेळा हा पुरस्कार जिंकला आहे.

# आज कुस्तीगीर खाशाबा जाधव क्रीडा महाकुंभाचा शुभारंभ

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार उद्घाटन

प्रतिनिधी
■ मुंबई

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या पुण्यतिथीनिमित्त "कुस्तीगीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभ 2025" चे आयोजन महाराणा प्रताप शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कुर्ला क्रीडा संकुलात करण्यात आले आहे. पारंपरिक खेळांचे जतन आणि प्रसार करणाऱ्या या महाकुंभचे उद्घाटन १३ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.




कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या महाकुंभात क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे अध्यक्षस्थानी असतील तर, कुस्तीवीर खाशाबा जाधव यांचे सुपुत्र रणजीत खाशाबा जाधव यांची विशेष उपस्थिती असणार आहे कौशल्य विकास विभाग आणि क्रीडाभारती यांच्या संयुक्त विद्यमाने "कुस्तीगीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभ 2025" चे आयोजन 13 ते 22 ऑगस्ट दरम्यान कुर्ला येथील क्रीडा संकुलात करण्यात आले आहे.

या महाकुंभात एकूण 16 प्रकारच्या पारंपरिक खेळांच्या स्पर्धा होणार असून, मल्लखांब, कबड्डी, खो-खो, भालाफेक, विटी - दांडू, कुस्ती, लगोरी, लंगडी, रज्जूमलखांब, पारंपरिक धाव स्पर्धा इत्यादी स्पर्धांचा समावेश असणार आहे. पारंपरिक खेळांचे जतन आणि प्रसार हे या स्पर्धांचे वैशिष्ट आहे. कुस्तीगीर खाशाबा जाधव पारंपरिक क्रीडा महाकुंभमध्ये युवक-युवतींमध्ये शारीरिक तंदुरूस्ती, संघभावना आणि स्पर्धात्मकता वाढवण्याच्या हेतूने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. मागील वर्षी या उपक्रमात जवळपास एक लाखांहून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यंदादेखील राज्यातील विविध जिल्ह्यातून खेळाडू यात सहभागी होणार आहेत. यावेळी युवक-युवतींना पारंपरिक खेळांविषयी मार्गदर्शनही केले जाणार आहे.

# मानहानीचा खटल्याबाबतच्या धोनीच्या याचिकेवर होणार सुनावणी

### मद्रास हायकोर्टाचा आदेश

वृत्तसंस्था
■ चेन्नई

माजी भारतीय कर्णधार एमएस धोनीच्या १०० कोटी रुपयांच्या मानहानीच्या खटल्याची सुनावणी करण्याचे आदेश मद्रास उच्च न्यायालयाने दिले आहेत. गर्दी आणि गोंधळ टाळता यावा म्हणून धोनीचा जबाब ॲडव्होकेट कमिशनरमार्फत नोंदवला जाईल.

धोनीने २०१४ मध्ये हा खटला दाखल केला होता आणि दोन प्रमुख माध्यम वाहिन्यांकडे नुकसान भरपाईची मागणी केली होती. २०१३ च्या आयपीएल सट्टेबाजी प्रकरणावरील टीव्ही चर्चेदरम्यान त्याच्याविरुद्ध



बदनामीकारक टिप्पण्या केल्याचा आरोप करण्यात आला होता.२०१३च्या आयपीएलमध्ये स्पॉट फिक्सिंग झाले होते. पोलिस तपासात बीसीसीआयचे माजी अध्यक्ष एन. श्रीनिवासन यांचे जावई, चेन्नई सुपर किंग्ज संघाचे प्रमुख गुरुनाथ मयप्पन आणि शिल्पा शेट्टी यांचे पती राज कुंद्रा यांच्यासारख्या मोठ्या नावांवर आरोप झाले होते. राजस्थान रॉयल्सचे तीन खेळाडू एस. श्रीसंत, अंकित चव्हाण आणि अजित चंडिला यांना अटक करण्यात आली. दोन्ही संघांवर प्रश्न उपस्थित होऊ लागले. या हायप्रोफाइल प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने लोढा समिती स्थापन केली.

२०१५ मध्ये समितीच्या शिफारशीवरून दोन्ही संघांवर २ वर्षांची बंदी घालण्यात आली. एका वकील आयुक्ताची नियुक्ती न्यायमूर्ती सी.व्ही. कार्तिकेयन यांनी एका वकिल आयुक्ताची नियुक्ती केली आहे जो धोनीच्या वतीने पुरावे आणि जबाब नोंदवेल. धोनीने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की तो न्यायालय आणि आयुक्तांच्या सूचनांचे पालन करेल आणि खटल्याला विलंब होऊ नये अशी त्याची इच्छा आहे.धोनी सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला आहे आणि आयपीएलमध्ये सीएसकेकडून खेळतो. धोनीने २००४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. २००७ मध्ये कर्णधार म्हणून त्याने भारताला टी२० विश्वचषक जिंकून दिला. २०११ मध्ये त्याने भारताला एकदिवसीय विश्वचषक जिंकून दिला. २०२० मध्ये त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.

# शिवनेरी रोड रेसमध्ये 500 पेक्षा जास्त धावपटूंचा सहभाग

प्रतिनिधी
■ मुंबई

येत्या १५ ऑगस्ट रोजी दादर (पूर्व) येथील शिवनेरी सेवा मंडळाच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या "शिवनेरी रोड रेसमध्ये" ५०० पेक्षा जास्त धावपटूंचा सहभाग लाभला आहे. १०, १२, १४, १६ वर्षांखालील मुला-मुलींच्या विविध वयोगटात ही रोड रेस रंगणार आहे. मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातील धावपटूंना या रेसमध्ये प्रवेश देण्यात आला आहे.

सर्वात जास्त धावपटू १४ वर्षांखालील गटात सहभागी झाले आहेत. या रेसमध्ये भाग घेतलेल्या काही धावपटूंनी मुंबई जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राज्य क्रॉस कंट्री स्पर्धेत केले आहे. मुंबई शहर व उपनगरातील अनेक नामवंत ॲथलेटिक संघाचे धावपटू या रेसमध्ये भाग घेत आहेत. मुंबई शहर जिल्हा हौशी ॲथलेटिक्स असोसिएशनच्या मान्यतेने ही




रेस होत असून त्या संघटनेचे पंच शर्यतीवर देखरेख ठेवतील. शर्यतीला सकाळी ६ वाजता शिंदेवाडी भवानीमाता मैदान, दादर (पूर्व) येथून सुरुवात होईल. रेस मध्ये विविध वयोगटासाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. अधिक माहितीसाठी मोबाईल क्रमांक ९७६९५९१४१३ अथवा ९८२१३९४७१२ यावर संपर्क साधावा.

# पालिकेच्या सार्वजनिक सुट्टयांमध्ये बदल करू नका - बाबा कदम

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सार्वजनिक सुट्टयांबाबत दरवर्षी पालिकेच्या वतीने परिपत्रक निर्गमित केले जाते. यावर्षी माहे जानेवारी व माहे मार्च मध्ये दोन वेळा जर सार्वजनिक सुट्टयांचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले. सदर दोन्ही परिपत्रकात दहीहंडी व अनंत चतुर्दशी या अनुक्रमे १६ ऑगस्ट व ६ सप्टेंबर रोजी सुट्टया जाहिर करण्यात आल्या होत्या.

या सुट्टया यावर्षी शनिवारी आल्यामुळे कामगारांना सुट्टीला जोडून रविवारची साप्ताहिक रजा उपभोगण्यासाठी आखलेले कार्यक्रम रद्द करण्याची वेळ त्यांच्यावर येईल. तसेच अगोदर घोषित झालेली रजा त्यांनी घेतली तर त्यांचे नुकसान होऊ शकते.

पालिकेने या अगोदर कधीही जाहिर न केलेल्या नारळी पौर्णिमा (८ ऑगस्ट) व गौरी विर्सजन ( .२ सप्टेंबर) या सुट्टया आयत्या वेळी म्हणजे ७ ऑगस्ट रोजी जाहिर केल्यामुळे कामगारांमध्ये नाराजी आहे. कारण दहीहंडी (गोपाळकाला) व अनंत चतुर्दशी या दोन दिवशी सार्वजनिक वाहतुक व्यवस्था विस्कळीत होते त्याचा फटका त्यांना बसु शकतो.तरी पालिकेने अगोदर जाहिर केलेल्या सुट्टयांमध्ये बदल करु नये, अशी मागणी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचेनेचे अध्यक्ष बाबा कदम यांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे.

# गिरगांव चौपाटी स्वराज्यभूमी वरील ध्वजारोहणाचा मान यंदा महापालिका अधिकाऱ्यांना

### स्वराज्य भूमि स्मारक समितीचा स्वागतार्ह निर्णय

प्रतिनिधी
■ मुंबई

गिरगांव चौपाटीवर असलेल्या स्वराज्यभूमी येथे लोकमान्य टिळकांच्या स्मारकासमोर यावेळचा ७८वा स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम आगळा वेगळा ठरावा असा आयोजित करण्यात आला आहे. पडद्यामागे राहून अहोरात्र राष्ट्राची सेवा करणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांना यंदा ध्वजारोहणाचा मान देण्यात येणार आहे.

यावर्षी १५ ऑगस्ट २०२५ या ७८व्या भारतीय स्वातंत्र्य दिनी महानगरपालिका डी विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री मनिष वळंजू हे गिरगाव चौपाटी येथील स्वराज्यभूमी येथे ध्वजारोहण करणार आहेत.

लोकमान्य टिळकांच्या स्मारकासमोरील कृतज्ञता ध्वजस्तंभाचे बांधकाम मुंबई महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त श्री मनिष वळंजू यांच्या देखरेखीखाली लवकरच सुरु होणार आहे. ब्रिटिश साम्राज्यात गुलामगिरीच्या रसातळाला गेलेल्या भारतीयांच्या मनात स्वराज्याची प्राणशक्ती फुंकून लोकमान्य टिळकांनी आपल्याला हक्काची जाणीव करून दिली. म्हणून महाराष्ट्रच नव्हे तर सर्व भारतीयांचे लक्ष वेधून घेणारा आणि अखंड स्वातंत्र्य लढ्याचे चिरंतन स्मरण करुन देणारा हा कृतज्ञता ध्वजस्तंभ उभारण्यात येत आहे. संकल्पना श्री प्रकाश सिलम यांची असून आराखडा सुप्रसिद्ध वास्तु विशारद श्री डी एम उपासनी यांनी तयार केला आहे. स्वराज्य भूमिवरील ध्वजारोहणाची वेळ सकाळी ठीक १० वाजताची असून सर्वांनी ९.४५ पर्यंत स्वराज्यभूमी ( गिरगाव चौपाटी) येथे उपस्थित रहावे, असे आवाहन स्वराज्य भूमि स्मारक समितीचे अध्यक्ष प्रकाश सिलम यांनी केले आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण 953 गुणवंत विद्यार्थ्यांचा पालिकेकडून सत्कार

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्यावतीने आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इयत्ता ८ वी) परीक्षेत यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने काल गौरव करण्यात आला. भायखळा (पूर्व) येथील अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात आयोजित या कार्यक्रमात गुणवत्ता यादीत (मेरिट लिस्ट) स्थान मिळविलेल्या इयत्ता ५ वीच्या ५३६ आणि इयत्ता ८ वीच्या ४१७ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.



यावेळी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उप आयुक्त (शिक्षण) डॉ. (श्रीमती) प्राची जांभेकर, ज्येष्ठ रंगकर्मी दिग्दर्शक, नाटककार अशोक हांडे, शिक्षण अधिकारी श्रीमती सुजाता खरे, सर्व उप शिक्षणाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी याप्रसंगी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद (पुणे) यांच्यावतीने दरवर्षी पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन करण्यात येते. यंदा ९ फेब्रुवारी २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी ही परीक्षा घेण्यात आली होती. यातील पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेतील इयत्ता ५ वीच्या ५३६ आणि इयत्ता ८ वीच्या ४१७ अशा एकूण ९५३ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत (मेरिट लिस्ट) स्थान मिळविले. जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी दरमहा शिष्यवृत्ती मिळणार आहे. गत तीन वर्षांपासून शिष्यवृत्ती परीक्षेत बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेच्या विद्यार्थ्यांचा यशाचा आलेख उंचावत आहे. गत वर्षी (२०२४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ६०३ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले होते. यामध्ये वाढ होऊन यंदा तब्बल ९५३ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे.

यंदाच्या परीक्षेत इयत्ता ५ वीतील रिद्धी कमलेश मिश्रा (वाकोला महानगरपालिका हिंदी शाळा क्रमांक २) या विद्यार्थिनीने ७९.१९ टक्के गुण मिळवून बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमधून प्रथम क्रमांक मिळविला. तसेच रोशनी संतोष तिवारी (वाकोला महानगरपालिका हिंदी शाळा क्रमांक २) या विद्यार्थिनीने ७७.८५ टक्के गुण मिळवून द्वितीय आणि श्वेता अवधेश चौहान (बंदरपाखाडी महानगरपालिका शाळा) या विद्यार्थिनीने ७६.५१ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

# दोन वकिलांनी पे-अँड-पार्कमधील भ्रष्टाचार केला उघड

प्रतिनिधी
■ मुंबई

दोन तरुण वकील ॲडव्होकेट सिब्ते हसन आणि ॲडव्होकेट कोटेश रेड्डी यांनी एका स्टिंग ऑपरेशनद्वारे महापालिकेच्या पे-अँड-पार्क व्यवस्थेतील प्रचंड भ्रष्टाचार उघड केला आहे. त्यांनी अनेक पार्किंग लॉटमधून कंत्राटदारांनी ठरवलेल्या दरांपेक्षा अनेक पट जास्त शुल्क आकारले जात असल्याचे उघड केले आहे. ते अधिकारी आणि कुलाबा पोलिसांवर कंत्राटदारांना संरक्षण देत असल्याचा आरोपही करत आहेत, ज्यामुळे सामान्य नागरिकांचे शोषण होत आहे.

ॲडव्होकेट रेड्डी यांनी त्यांची कार के. दुबाश रोडवरील पे-अँड-पार्क लॉटमध्ये पार्क केली, जी मेसर्स पिंपळेश्वर महिला बचत ग्रुप चालवते. तेथे त्यांना ५०० रुपये देण्यास सांगण्यात आले, जे महापालिकेच्या प्रति तास ७० रुपयांच्या दरापेक्षा खूपच जास्त होते. विरोध केल्यावर, शुल्क ४०० रुपये करण्यात आले आणि यूपीआई द्वारे पैसे भरल्यानंतर पावती देण्यात आली. त्याच दिवशी, लॅन्सडाउन रोडवरील मेसर्स क्रिएटिव्ह एंटरप्रायझेस चालवणाऱ्या पार्किंग लॉटमध्ये त्यांना ७०० रुपये आकारण्यात आले. ६ जुलै रोजी, के. द्वारे चालवल्या जाणाऱ्या पार्किंगमध्ये त्यांना ७०० रुपये आकारण्यात आले. दुबाश रोडवरील एका तासासाठी २०० रुपये आकारण्यात आले. वकील रेड्डी जेव्हा कुलाबा पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यासाठी गेले तेव्हा त्यांना सहा तास वाट पहावी लागली. त्यांनी पावत्या आणि जीपीएस-टॅग केलेले फोटो असे पुरावे सादर केले. बराच वेळ नंतर, पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध तक्रार दाखल केली.

वकील हसन आणि रेड्डी जनहित याचिका आणि रिट याचिका दाखल करण्याची तयारी करत आहेत. ते दोषी कंत्राटदारांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची, मेसर्स पिंपळेश्वर महिला बचत ग्रुप आणि मेसर्स क्रिएटिव्ह एंटरप्रायजेस यांना काळ्या यादीत टाकण्याची आणि संगनमत करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करत आहेत. जर बीएमसी आणि पोलिसांनी त्वरित कारवाई केली नाही तर ते मुंबई उच्च न्यायालयात जातील.

# रिक्षा चालक भगिनीला रक्षाबंधनाच्या दिवशी डॉ. मुरारका यांनी दिली ऑटो रिक्षा भेट



प्रतिनिधी
■ मुंबई

मानवी मूल्ये ही समाजातील कोणत्याही व्यावहारिक जीवनाचा आधार आहे. यामुळे एकमेकांबद्दल प्रेरणा आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण होते. मुंबईचे प्रसिद्ध समाजसेवक डॉ. अनिल काशी मुरारका काही दिवसांपूर्वी ऑटो रिक्षाने कुठेतरी जात होते. एक महिला रिक्षा चालवत होती. त्यांनी उत्सुकतेने तिला विचारले की ती रिक्षा का चालवत आहे.

रिक्षा चालक सारिका मिस्त्री नावाच्या महिलेने सांगितले की तिचा पती काही महिन्यांपासून आजारी आहे, त्यामुळे घरचा खर्च चालवणे कठीण होत आहे. म्हणूनच मी रिक्षा चालवून माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. "महिलांच्या वेदनादायक कथेने" प्रभावित होऊन, डॉ. मुरारका यांनी तीचा फोन नंबर घेतला. रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणी त्यांच्या भावांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्याची कामना करत होत्या आणि भाऊ त्यांना त्यांच्या आवडीच्या भेटवस्तू देत होते. या रक्षाबंधनाच्या दिवशी डॉ. अनिल मुरारका यांनी सारिका मिस्त्री यांच्याकडून राखी बांधून घेत एक नवीन ऑटो रिक्षा भेट दिली, केवळ त्यांना मदत केल्याबद्दलच नाही तर क्वचितच आढळणाऱ्या मानवी मूल्यांचे उदाहरण मांडल्याबद्दलही. हा समाजासाठी एक संदेश आहे. रिक्षा चालक भगिनीला ऑटो रिक्षा भेट देताना डॉ. अनिल मुरारका यांनी सारिका यांना आश्वासन दिले की आजपासून ती त्यांच्या बहिणीसारखी असून हा भाऊ नेहमीच तिच्या पाठीशी उभा राहील.

# बाळगोपाळांसाठी गणेशमूर्ती प्रशिक्षण शिबीर

### शिवसेना आणि रोटरी क्लब यांचा संयुक्त उपक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शाखा क्रमांक १४ चे शाखाप्रमुख अभिलाष कोंडविलकर, महिला शाखा संघटक सौ. वनिता दळवी यांच्या पुढाकाराने तसेच रोटरी क्लब ऑफ बोरीवली यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गणेश मूर्ती तयार करण्यासाठी लहान मुलांचे प्रशिक्षण शिबीर वैश्य समाज सभागृह, बोरीवली पूर्व येथे रविवारी आयोजित करण्यात आले होते. लहान मुले आणि मुली यांचा यात



उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिवसेना महिला विभाग संघटक सौ. शुभदा शिंदे, सौ. रोहिणी चौगुले, मुंबई विद्यापीठ अधिसभा सदस्य मिलिंद साटम, शशिकांत झोरे, सिमिंतिनी नारकर, स्मीता डेरे, अशोक म्हामूणकर, दिनेश विचारे, अमित गायकवाड, श्याम कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

# शूरवीर बाजीप्रभु मंडळातर्फे नारळी पौर्णिमेचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा




प्रतिनिधी
■ मुंबई

घाटकोपर पूर्व येथील शूरवीर बाजीप्रभु मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे नारळी पौर्णिमेचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी संस्कृती ची जतन करीत शूरवीर बाजीप्रभु मंडळामार्फत प्रत्येक सण साजरा केला जातो. त्याप्रमाणे नारळी पौर्णिमेचा उत्सव साजरा केला.

या कार्यक्रमास ईशान्य मुंबईचे विभाग प्रमुख सुरेश पाटील, उपविभाग प्रमुख अजित गुजर विधानसभा संघटक अशोक वंडेकर समन्वयक राम पाल, कामतेकर, महेश जंगम, माटे मंडळाचे संस्थापक नाना उतेकर, मंडळाचे सचिव संतोष नेहरकर, सल्लागार, महेश पोद्दार, रमेश पवार, जगदीश विचारे, दिनेश सावंत आदिसह शिवसैनिक आणि मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# समाजातील भेदाभेद दूर करून एकात्मतेचा संदेश देणे हा संतांचा धर्म – मंत्री छगन भुजबळ

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र ही संतभूमी आहे. संत चोखामेळा, संत जनाबाई, संत नामदेव यांसह अनेक संतांनी जात-पात व उच्च-नीच भेद नष्ट करून समतेचा संदेश दिला. संत साहित्याच्या माध्यमातून दया, क्षमा, करुणा आणि प्रेम यांचा प्रसार झाला. समाजातील भेदाभेद दूर करून एकात्मतेचा संदेश देणे हा संतांचा धर्म असल्याचे प्रतिपादन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. वारकरी साहित्य परिषदेच्यावतीने आयोजित कार्यक्रमात मंत्री भुजबळ बोलत होते.

या कार्यक्रमाला मराठी भाषा, उद्योग मंत्री उदय सामंत, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, आमदार संतोष बांगर, माजी आमदार शहाजी पाटील, वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष हभप विठ्ठल महाराज पाटील, हभप निवृत्ती महाराज रामदास, हभप नरहरी महाराज चौधरी, हभप रामदास महाराज तसेच राज्यभरातील वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री सामंत यांनी सांगितले की, वारी ही जगातील सर्वात मोठी आध्यात्मिक परंपरा आहे. वारकरी साहित्य संमेलनासाठी संपूर्ण मदत दिली आहे. ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा घराघरात पोहोचविण्यासाठी प्रत्येकी एक कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला. पैठण येथील संतपीठ व रामटेक संस्कृत विद्यापीठ सुरू केले आहे. यंदा पद्म पुरस्कारासाठी राज्यातील कीर्तनकारांची नावे पाठविण्यात आली आहेत.

मंत्री शिरसाट म्हणाले, वारकरी संप्रदाय समाजहितासाठी कार्यरत आहे. वारीसाठी सर्व दिंड्यांना प्रत्येकी 20 हजार रुपये निधी देण्याचा येणार आहे. यापूर्वी प्रथम वर्षी बाराशे दुसऱ्या वर्षी चौदाशे दिंड्यांनी निधी दिला होता. वारकरी संप्रदाय सांस्कृतिक वारसा पुढे नेण्याचे काम करीत आहे. दिंड्यांना निधी देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सन्मानाचे वारकरी संप्रदायाने आयोजन केले, याबद्दल आभारी आहे. शासन हे संत परंपरेच्या जतनासाठी प्रयत्नशील आहे. राज्य शासन वारकऱ्यांच्या मदतीसाठी नेहमी तत्पर राहील.

## जया बच्चन अमिताभ यांच्या पत्नी म्हणून त्यांचे नखरे लोक सहन करतात !

**नवी दिल्ली :** बॉलिवूड अभिनेत्री तथा खासदार कंगना रणौत आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे नेहमीच चर्चेत असते. बॉलिवूडमधील घराणेशाही ते देशातील राजकारण अशा विविध विषयांवर ती नेहमी रोखठोक मतं मांडते. विविध विषयांवर बिनधास्त प्रतिक्रिया दिल्यामुळे अनेकदा ट्रोलही होते. दरम्यान, कंगना रणौत आता सपाच्या खासदार जया बच्चन यांच्यावर भडकल्याचं पाहायला मिळालं आहे. खासदार जया बच्चन यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये जया बच्चन या सेल्फी काढणाऱ्या एका व्यक्तीला ढकलताना दिसत आहेत. जया बच्चन यांचं हे वागणं पाहून नेटकऱ्यांनी त्यांच्यावर टीका केली आहे. तसेच कंगना रणौतनेही जया बच्चन यांचा हा व्हिडीओ इंस्टाग्रामवर स्टोरी ठेवत त्याला कॅप्शन देत खोचक टीका केली आहे. 'जया बच्चन या अमिताभ यांच्या पत्नी आहेत म्हणून त्यांचे नखरे लोक सहन करतात', असं कंगना रणौतने म्हटलं आहे.



# युनुस सरकारला धक्का, भारताकडून नवे निर्बंध

## बांग्लादेशच्या कुरापतीचे भारताचे 'जशास तसे' उत्तर

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

युनुस सरकार आल्यापासून बांगलादेशाच्या भारताविरोधी कुरापत्या सुरूच आहेत. आता त्याला भारताने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. बांगलादेशातून येणाऱ्या तागाच्या वस्तूंवर नवे निर्बंध लादले आहेत. तागापासून ( Jute ) बनवलेले कपडे, दोरखंड आणि पोती आता भारत-बांगलादेश सीमेवरील कोणत्याही भूभागावरील बंदरातून आयात करता येणार नाहीत. या वस्तू फक्त न्हावाशेवा बंदरातूनच मागवता येतील. डीजीएफटीने याबाबत सोमवारी अधिसूचना जारी केली. या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील व्यापारावर परिणाम होण्याची शक्यता आहे, कारण बांगलादेशही भारतीय वस्तूंवर अनेक निर्बंध लादतो, असे भारताचे म्हणणे आहे.

भारताने बांगलादेशातून येणाऱ्या तागाच्या वस्तूंबाबत कठोर भूमिका घेतली आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने (डीजीएफटी)



नवीन नियम जारी केले आहेत. त्यानुसार, बांगलादेशातून तागचे काही विशिष्ट सामान आता भारतात फक्त एकाच बंदरातून आयात करता येणार आहे, ते म्हणजे न्हावा शेवा. यापूर्वी हे सामान भारत-बांगलादेश सीमेवरील अनेक लँड पोर्ट्सवरून येत होते, पण आता ते शक्य होणार नाही.

भारत आणि बांगलादेश यांच्यातील व्यापारी संबंधात काही काळापासून अडचणी येत आहेत. यापूर्वीही भारताने बांगलादेशातून येणाऱ्या काही वस्तूंवर बंदी घातली होती. त्यात रेडीमेड कपडे आणि प्लास्टिकच्या वस्तूंचा समावेश होता. आता तागाच्या वस्तूंवरही निर्बंध लादण्यात आले आहेत.

बांगलादेशही भारतीय वस्तूंना आपल्या देशात येण्यापासून रोखतो, त्यामुळे भारताने हे पाऊल उचलले आहे, असे जाणकारांचे मत आहे. विशेषत: त्या वस्तूंना जे भारताच्या उत्तर-पूर्व राज्यांमध्ये जातात. मे महिन्यात भारताने बांगलादेशातून येणारे रेडीमेड कपडे फक्त कोलकाता आणि न्हावा शेवा बंदरातून आणण्याची परवानगी दिली होती. त्यावेळी भारताने म्हटले होते की, बांगलादेश भारतीय वस्तूंना आपल्या लँड पोर्ट्सवरून येऊ देत नाही. भारताचे म्हणणे आहे की, बांगलादेशच्या व्यापार धोरणांमुळे भारताला आर्थिक नुकसान होत आहे.

काही महिन्यांपूर्वी भारताने बांगलादेशातून येणारे सामान आपल्या बंदरांवरून आणि विमानतळांवरून दुसऱ्या देशांमध्ये पाठवण्याचा करार रद्द केला होता. हा करार जवळपास पाच वर्षांपूर्वी झाला होता. यावरूनही दोन्ही देशांमध्ये तणाव होता. बांगलादेश भारततून येणारे तांदूळ, कापूस आणि धाग्यासारख्या वस्तूंवर खूप जास्त टॅरिफ लावतो. यामुळे प्रादेशिक विकासात अडथळा येत आहे, असे भारताचे म्हणणे आहे.

## गौतम अदानींवर पैशांचा पाऊस

# एकाच दिवसात कमावले 5.74 अब्ज डॉलर्स



## अब्जाधिशांच्या यादीत टॉप 20 मध्ये समावेश

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

सलग सहा आठवडे सुरु असलेली शेअर बाजारातील घसरण 8 ऑगस्ट रोजी थांबली. या दिवशी सेन्सेक्स 746.29 अंकांच्या वाढीसह 80604.08 अंकांवर बंद झाला. त्याच वेळी, निफ्टी 221.75 अंकांनी वाढल्यानंतर 24585.05 अंकांवर बंद झाला. शेअर बाजारातील वाढीचा सर्वाधिक फायदा उद्योगपती गौतम अदानी यांना झाला आहे. त्यांच्या संपत्तीत फक्त एका दिवसात 5.74 अब्ज डॉलर्सची वाढ झाली आहे.

शेअर बाजारातील या तेजीचा सर्वाधिक फायदा उद्योगपती गौतम अदानी यांना झाला. फक्त एका दिवसात त्यांची संपत्ती 5.74 अब्ज डॉलर्स (5,03, 01, 91,88,700) ने वाढली. यासह, त्यांची एकूण संपत्ती 79.7 अब्ज डॉलर्स झाली आणि ते ब्लूमबर्ग अब्जाधीश निर्देशांकातील टॉप 20 श्रीमंतांच्या यादीत परतले. गौतम आदनी यांच्याबरोबरच अन्य भारतीय अब्जाधिशांच्या संपत्तीत देखील वाढ झाली आहे. अब्जाधिशांच्या यादीत मुकेश अंबानी 18 व्या क्रमांकावर आहेत. त्यांनी एका दिवसात 1.40 अब्ज डॉलर्सची कमाई केली आहे. एचसीएलचे संस्थापक शिव नाडर हे देखील अब्जाधिशांच्या यादीत 56 व्या क्रमांकावर आहेत. शेअर बाजारातील तेजीचा मोठा फायदा झाल्याचे पाहायाल मिळत आहे.

अब्जाधिशांच्या यादीत मुकेश अंबानी 18 व्या क्रमांकावर आहेत. त्यांनी एका दिवसात 1.40 अब्ज डॉलर्सची कमाई केली आहे. सध्या त्यांची एकूण संपत्ती 99.5 अब्ज डॉलर्स आहे. कमाईच्या बाबतीत फक्त एलोन मस्क अदानींपेक्षा पुढे आहेत. $6.69 अब्जच्या वाढीसह, ते जगातील टॉप 20 श्रीमंत व्यक्तींच्या यादीत पहिल्या क्रमांकावर आहेत.

ओरेकलचे संस्थापक लॅरी एलिसन यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहेत. त्यांची संपत्ती $3.30 अब्जने वाढली आहे. यासह, त्यांची एकूण संपत्ती $305 अब्जवर पोहोचली आहे. फेसबुकचे सीईओ मार्क झुकरबर्ग $269 अब्जच्या एकूण संपत्तीसह जगातील तिसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती असले तरी, या काळात त्यांना $1.15 अब्जचे नुकसान सहन करावे लागले आहे.

पान 1 वरुन...

## महापालिका आपल्याकडेच राहणार

त्यावेळी काय करायला हवं, काय नको, याचं प्रात्यक्षिक दाखवलं. ते दाखवताना मी येथेच पहिल्या रांगेत बसलो होतो. माझ्या बाजूला महानगरपालिकेचे अधिकारी होते. ते मला म्हणाले, उद्धवजी येथेच खाली लॉबीमध्ये डेंग्यूच्या अळया सापडल्या आहेत. म्हटलं आता बोंबला, आता घरी जयेपर्यंत हुडहुडी भरतेय की का? याची वाट बघत होतो. मात्र सुदैवाने तसं झालं नाही. एकूण काय, आपण सामाजिक बांधिलकी विसरलो नाही.

## पिक्चर अभी बाकी है !

गेल्या वर्षी कर्नाटक आणि महाराष्ट्रात हे षड्यंत्र घडले होते आणि आता 'एसआयआर'द्वारे बिहारमध्ये त्याची पुनरावृत्ती करण्याची तयारी सुरू आहे.ही फक्त एक-दोन जागांची गोष्ट नाही तर हे अनेक जागांवर घडले आहे. या गोष्टी राष्ट्रीय पातळीवर आणि नियोजनानुसार केल्या जात आहेत. निवडणूक आयोगाला याची जाणीव आहे. पूर्वी आमच्याकडे कोणतेही पुरावे नव्हते, आता पुरावे आहेत, असेही ते म्हणाले.

## आमदारांना 10 महिन्यांपासून निधी नाही

अडचण येत असल्याचा दावा केला आहे. काही लोकप्रिय योजनांमुळे राज्य सरकार आर्थिक अडचणीत सापडले आहे. त्यामुळे मागील 10 महिन्यांपासून एकाही आमदाराला निधी मिळाला नाही, असे आमदार संजय गायकवाड यांनी म्हटले आहे.दुसरीकडे, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी त्यांचा दावा फेटाळून लावला आहे. आमदारांना निधी मिळत नसल्याच्या दावात कोणतेही तथ्य नाही. आमच्या सगळया आमदारांना निधी दिला जात आहे. तुम्ही माझ्या खात्याचे विचाराल तर आमचे डिपार्टमेंटचे जे एसटी डेपो किंवा एसटी स्टँड आहेत, त्यासाठी आमच्या डिपार्टमेंटच्या माध्यमातून निधीची व्यवस्था केली जाते. त्यामुळे अशा प्रकारचे आमदाराने केलेले विधान माझ्या तरी निदर्शनास आले नाही, असे सरनाईक म्हणाले. आमदार संजय गायकवाड व मंत्री प्रताप सरनाईक यांच्या या विरोधाभासी दाव्यांमुळे शिवसेनेतच या प्रकरणी मतमतांतरे असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# पुढील महिन्यापासून भारत-चीन दरम्यान थेट विमानसेवा

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली/बीजिंग**

भारत आणि चीन पुढील महिन्याच्या सुरुवातीला थेट विमानसेवा सुरू करू शकतात. ब्लूमबर्गच्या अहवालात हा दावा करण्यात आला आहे. दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये सुधारणा झाल्याचे हे लक्षण मानले जात आहे.

अहवालात म्हटले आहे की, भारत सरकारने एअर इंडिया आणि इंडिगो सारख्या विमान कंपन्यांना चीनला त्वरित उड्डाणे सुरू करण्यासाठी सज्ज राहण्यास सांगितले आहे. कोरोना काळानंतर ही सेवा बंद करण्यात आली. यानंतर, जून २०२० मध्ये झालेल्या गलवान संघर्षामुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी बिघडले. हे



चित्र १५ जून २०२० रोजी लडाखच्या गलवान खोऱ्यात भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये झालेल्या रक्तरंजित चकमकीचे आहे. यानंतर दोन्ही देशांमधील वाद आणखी वाढला.

कोरोना साथीपूर्वी, दोन्ही देशांदरम्यान दरमहा ५३९ थेट उड्डाणे होत असत. त्यांची एकूण क्षमता १.२५ लाखांपेक्षा जास्त जागांची होती. या विमानांमध्ये एअर इंडिया, चायना सदर्न एअरलाइन्स, चायना ईस्टर्न एअरलाइन्स सारख्या कंपन्यांचा समावेश होता. विमान सेवा बंद झाल्यानंतर, दोन्ही देशांतील प्रवासी बांगलादेश, हाँगकाँग, थायलंड आणि सिंगापूर सारख्या कनेक्टिंग हबमधून प्रवास करत असत. तथापि, हा प्रवास महागडा होता.

हवाई वाहतूक माहिती देणारी कंपनी सिरियमच्या मते, जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान भारत आणि चीन दरम्यान प्रवास करणाऱ्या लोकांची संख्या ४.६ लाख होती. तर, २०१९ च्या पहिल्या १० महिन्यांत हा आकडा १० लाख होता. जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान, १.७३ लाख लोकांनी हाँगकाँग मार्गे, ९८ हजारांनी सिंगापूर मार्गे, ९३ हजारांनी थायलंड मार्गे आणि ३० हजार लोकांनी बांगलादेश मार्गे दोन्ही देशांमध्ये प्रवास केला.

## बंगळुरू विद्यापीठात कुत्र्यांच्या हल्ल्यात 2 विद्यार्थिनी जखमी

**बंगळुरू**

मंगळवारी बंगळुरू विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात दोन विद्यार्थिनी जखमी झाल्या. त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. ही घटना सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. या मुली डॉ. बीआर आंबेडकर स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स युनिव्हर्सिटीमध्ये अर्थशास्त्रातील इंटिग्रेटेड एमएससी कोर्सच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी आहेत. सौजन्या (कर्नाटक) आणि रेगा निक्षिता (तेलंगणा) अशी त्यांची ओळख पटली आहे. कुत्र्यांच्या हल्ल्यात सौजन्या गंभीर जखमी झाली आहे. तिला एका खासगी रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे. रेगावर उपचार सुरू आहेत. दिल्ली-एनसीआरमध्ये भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी, त्यांची नसबंदी करण्यासाठी आणि त्यांना आश्रयगृहात ठेवण्याचे कडक निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही घटना घडली. ११ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने इशारा दिला होता की, आदेशात कोणताही अडथळा आणल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. न्यायालयाने कुत्र्यांचे हल्ले आणि रेबीजच्या धोक्याला तोंड देण्यासाठी त्वरित पावले उचलण्यास सांगितले आहे.

# मध्य प्रदेश सरकार झोपले आहे का? 6 वर्षात 13% OBC होल्ड पदांवर काय केले?

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

मध्य प्रदेशातील सरकारी भरतींमध्ये इतर मागासवर्गीय (ओबीसी) साठी राखीव असलेल्या १३% पदांवर नियुक्ती करण्याच्या प्रकरणात मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारला फटकारले. ओबीसी महासभेचे वकील वरुण ठाकूर म्हणाले- न्यायालयाने म्हटले- मध्यप्रदेश सरकार झोपले आहे का? १३% ओबीसी होल्ड पदांसाठी ६ वर्षात त्यांनी काय केले? वकील ठाकूर म्हणाले, एमपीपीएससीच्या निवडक उमेदवारांनी ही याचिका दाखल केली आहे, ज्यांना नियुक्ती दिली जात नाही. या प्रकरणात, मध्य प्रदेश सरकारने २९ सप्टेंबर २०२२ रोजी एक अधिसूचना जारी केली होती, ज्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सरकारने

### अंतिम सुनावणी 23 सप्टेंबर रोजी

न्यायालयाला सांगितले होते की, आम्हालाही आरक्षण द्यायचे आहे. अशा परिस्थितीत, अध्यादेशावरील स्थगिती रद्द करावी.

यावर न्यायालयाने म्हटले, सर्वात मोठी गोष्ट म्हणजे, मध्य प्रदेश सरकारचे लोकप्रतिनिधी जे म्हणतात की आम्ही ओबीसींना २७% आरक्षण देण्यास वचनबद्ध आहोत, त्यांचे वकील जेव्हा सुनावणीला पोहोचतात, तेव्हा आदेश दिला जातो. मग हे नेते म्हणतात की अध्यादेशावरील स्थगिती रद्द न झाल्यामुळे प्रशासकीय समस्या निर्माण होत आहेत.

मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात, मध्य प्रदेश लोकसेवा आयोगाच्या (MPPSC) निवडलेल्या उमेदवारांच्या वतीने वरिष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी न्यायालयासमोर केस सादर केली.हे प्रकरण अत्यंत महत्त्वाचे मानून न्यायालयाने ते बोर्डाच्या वरच्या क्रमांकावर नोंदवले आहे. २३ सप्टेंबर रोजी पहिल्या क्रमांकावर सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे. १३% होल्डच्या प्रकरणातील सर्व याचिकांवर ही अंतिम सुनावणी असेल.

# न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधातील महाभियोग प्रक्रियेला सुरुवात

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंगळवारी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग प्रक्रिया सुरु केली. न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरील आरोपांची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय समितीची स्थापना लोकसभा अध्यक्षांनी केली. या समितीमध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मनिंद्र मोहन श्रीवास्तव आणि कर्नाटक उच्च न्यायालयातील वरिष्ठ वकील बी. व्ही. आचार्य यांचा समावेश आहे.

समितीने शक्य तितक्या लवकर आपला अहवाल सादर करावा. चौकशी समितीचा अहवाल मिळेपर्यंत न्यायमूर्ती वर्मा यांच्या विरोधातील महाभियोग प्रस्ताव प्रलंबित राहील, असे ओम बिर्ला म्हणाले. २१ जुलै रोजी, रविशंकर प्रसाद आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह १४६ लोकसभेच्या खासदारांच्या सह्या असलेला न्यायमूर्ती वर्मा यांना हटवण्याचा प्रस्ताव मिळाला, असे लोकसभा अध्यक्षांनी सांगितले.

दरम्यान, १४ मार्च रोजी



दिल्लीतील सरकारी निवासस्थानी जळालेल्या नोटा सापडल्यानंतर न्यायमूर्ती वर्मा वादात सापडले. त्यानंतर त्यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली. त्यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव आणला जाऊ नये म्हणून न्यायमूर्ती वर्मांनी सर्वोच्च न्यायालयात देखील धाव घेतली होती.

# शिक्षा पूर्ण झालेल्या कैद्यांना तात्काळ सोडा

### सर्वोच्च न्यायालयाचे सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश

**नवी दिल्ली:** शिक्षा पूर्ण झाल्यानंतरही तुरुंगात असलेल्या कैद्यांबद्दल सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी चिंता व्यक्त केली. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी शिक्षा पूर्ण झालेल्या कैद्यांना तुरुंगातून तात्काळ सोडावे, असे निर्देश न्यायालयाने दिले. २००२ च्या नितीश कटारा हत्याकांडातील सुखदेव यादव उर्फ पहेलवानची सुटका करण्याचे आदेश देताना न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले. यादवने या वर्षी मार्चमध्ये २० वर्षांची शिक्षा पूर्ण केली. त्यानंतर त्याची सुटका करणे अपेक्षित होते, असे खंडपीठाने म्हटले. न्यायालयाच्या या आदेशाची प्रत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गृह सचिवांना पाठवावी जेणेकरून कोणताही आरोपी किंवा दोषी शिक्षेच्या कालावधीपेक्षा जास्त काळ तुरुंगात राहिला आहे का? हे तपासता येईल, असे खंडपीठाने म्हटले.

# 10 ते 15 वर्षे जुन्या वाहनांच्या मालकांविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई होणार नाही

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

10 वर्षे जुन्या डिझेल आणि 15 वर्षे जुन्या पेट्रोल वाहनांच्या मालकांवर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही, असं आज सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीश बीआर गवई यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. यामुळे दिल्लीतील जुन्या वाहनांच्या मालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हा निर्णय दिल्लीतील वायू प्रदूषणाशी संबंधित एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान घेण्यात आला.



सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी 2018 मध्ये दिल्ली एनसीआर क्षेत्रात वाहनांवर रंगीत स्टिकर्स लावण्याचा आदेश दिला होता. ज्यामुळे वाहन कोणत्या इंधनावर चालते हे समजेल (उदा. पेट्रोल/सीएनजीसाठी हलका निळा आणि डिझेलसाठी नारंगी स्टिकर). मात्र या आदेशाचे पालन न झाल्याने जुन्या वाहनांच्या मालकांना कारवाईचा सामना करावा लागत होता.

आता सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, जुन्या वाहनांच्या मालकांवर कोणतीही कठोर कारवाई होणार नाही. यामुळे दिल्लीतील अनेक वाहन मालकांना दिलासा मिळाला आहे, ज्यांना प्रदूषण नियंत्रण नियमांमुळे आपली वाहने गमावण्याची भीती होती. कोर्टाने यासंबंधी पुढील सुनावणी 21 मार्च 2025 रोजी ठेवली आहे.

## असीम मुनीर यांच्या अणू हल्ल्याच्या धमकीनंतर ओवैसी भडकले

# मुनीर 'सडकछाप आदमी'

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवला. मात्र, तरी देखील पाकिस्तानमधील काही नेते भारताविरोधात गरळ ओकत आहेत. पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो आणि पाकिस्तानचे लष्करप्रमुख तथा फील्ड मार्शल असीम मुनीर हे भारताच्या विरोधात वेगवेगळी विधाने करत भारताला अणू हल्ल्याच्या धमक्या देत आहेत.

दरम्यान, बिलावल भुट्टो आणि असीम मुनीर यांच्या विधानाला भारतानेही जशास तसं प्रत्युत्तर दिलं आहे. असीम मुनीर यांनी भारताला दिलेल्या अणू हल्ल्याच्या धमकीनंतर आता खासदार असदुद्दीन ओवैसी हे त्यांच्यावर चांगलेच भडकले आहेत. असीम मुनीर यांचा उल्लेख खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी 'सडकछाप आदमी' असा करत



पाकिस्तानवर जोरदार टीका केली आहे. या संदर्भातील वृत्त न्यूज १८ ने दिलं आहे.

असीम मुनीर यांच्या धमकीसंदर्भात बोलताना असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटलं की, "पाकिस्तानी लष्करप्रमुखांचे शब्द आणि त्यांच्या धमक्या निंदनीय आहेत. मात्र, दुर्दैवाची गोष्ट म्हणजे ते अमेरिकेत बसून बोलत आहे. अमेरिका भारताचा धोरणात्मक भागीदार आहे. तरीही असीम मुनीर हे सडकछाप माणसाप्रमाणे बोलत आहेत. आपल्याला हे देखील समजून घेणं आवश्यक आहे की पाकिस्तानी लष्कराकडून आणि त्यांच्या काही राज्याकडून आपल्याला कायम धोका राहू शकतो. त्यामुळे आपल्याला आपलं संरक्षण बजेट वाढवावं लागेल, जेणेकरून आपण तयार राहू शकू", असं खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटलं आहे.

पाकिस्तानचे लष्करप्रमुख तथा फील्ड मार्शल असीम मुनीर यांनी अमेरिकेत एका कार्यक्रमात बोलताना म्हटलं होतं की, "आपण एक अणुशक्ती-संपन्न राष्ट्र आहोत. जर आपल्याला वाटलं की आपण बुडत आहोत, तर आपण अर्धे जग आपल्यासोबत घेऊन बुडू", असं विधान असीम मुनीर यांनी केलं होतं.

अमेरिकेतील टाम्पा शहरात पाकिस्तानी वंशाच्या लोकांसाठी डिनरचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी असीम मुनीर म्हणाले आता जर संघर्ष सुरु झाला तर भारताच्या पूर्व भागापासून सुरुवात करत आपण पश्चिमेच्या दिशेने जाऊ. मुकेश अंबानी यांची जामनगरमध्ये जी रिफायनरी आहे ती जगातली सर्वात मोठी रिफायनरी आहे. या रिफायनरीवर हल्ला करु. पाकिस्तानकडे अणुबॉम्ब आहे.

# आधार नागरिकत्वाचा पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही : सर्वोच्च न्यायालय

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी देशाच्या निवडणूक आयोगाच्या (ECI) भूमिकेचे समर्थन केले की आधारला नागरिकत्वाचा निर्णायक पुरावा मानला जाऊ शकत नाही. नागरिकत्वासाठी स्वतंत्र पडताळणी आवश्यक असल्यावर कोर्टाने भर दिला.

न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण प्रक्रियेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना हे निरीक्षण नोंदवले. आधारला नागरिकत्वाचा मुख्य पुरावा



म्हणून स्वीकारता येणार नाही, हे सांगणे निवडणूक आयोगाचे योग्यच आहे. त्याची पडताळणी होणे आवश्यक आहे,असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांना सांगितले.

या पडताळणीचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे का, हे ठरवणे हा पहिला प्रश्न असल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. ;जर त्यांच्याकडे अधिकार नसेल, तर सर्व काही तिथेच संपेल. पण जर त्यांच्याकडे अधिकार असेल, तर कोणतीही समस्या असणार नाही,असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी नमूद केले.

सिब्बल यांनी युक्तिवाद केला की निवडणूक आयोगाच्या या प्रक्रियेमुळे मोठ्या संख्येने मतदार वगळले जातील, विशेषतः जे आवश्यक फॉर्म सादर करू शकत नाहीत. 2003 च्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या मतदारांनाही नवीन फॉर्म भरण्यास सांगितले जात आहे आणि तसे न केल्यास त्यांची नावे मतदार यादीतून वगळली जातील, जरी त्यांच्या निवासस्थानात कोणताही बदल झाला नसला तरी, असा दावा त्यांनी केला. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर बिहार मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती (SIR) शी संबंधित याचिकांवर सुनावणी सुरू होती. न्यायमूर्ती कांत यांनी याचिकाकर्त्यांकडून बाजू मांडणारे वकील कपिल सिब्बल यांना सांगितले की, 'निवडणूक आयोगाचे म्हणणे बरोबर आहे की आधार हा नागरिकत्वाचा निर्णायक पुरावा म्हणून स्वीकारला जाऊ शकत नाही. त्याची पडताळणी केली पाहिजे.'